POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३०६ ● मुंबई, सोमवार, ०८ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

बिभत्सतेचा कळस... थेट इमामाशी लग्न करायची ऑफर

नाशिकच्या टीसीएस कंपनीतील धर्मांतर प्रकरणी निदा खानच्या खुलाश्याने सर्वच हादरले

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

नाशिकच्या टीसीएस कंपनीतील लैंगिक छळ आणि कथित धर्मांतर प्रकरणात आता आरोपपत्र दाखल करण्यात आलं असून त्यातून अनेक धक्कादायक खुलासे झाले आहेत. आरोपी दानिश शेखने त्याचे लग्न लपवले आणि नंतर तिला एका इमामशी लग्न करण्याचा सल्ला दिला, असा आरोप एका पीडितने केलाय. तिचे नाव बदलणे, कागदपत्रे गोळा करणे आणि तिचे धर्मांतर करण्याच्या कथित योजनेचाही आरोपपत्रात उल्लेख आहे.

नाशिकमधील आयटी कंपनीतील काही महिलांचे झालेले लैंगिक शोषण आणि कथित धर्म परिवर्तनाचा प्रयत्न झाल्याचे प्रकरण उघडकीस आल्यापासून राज्यात एकच संतापाची लाट उसळली आहे. या केसमध्ये एचआर निदा खानसह अनेकांना अटक झाली असून आता आरोपपत्र दाखल करण्यात आली आहे. त्यातून अनेक मोठे, धक्कादायक खुलासे झालेत. चार्जशीटमधील पीडित तरूणीच्या जबाबानुसार, आरोप दानिश शेख याने त्याचं लग्न झाल्याची आणि मुलं असल्याची माहिती पीडितेपासून लपवली होती. मात्र जेव्हा तिला याबद्दल समजलं आणि तिने त्याच्याकडे विचारणा केली, माज्याशी आता लग्न कोण करणार असं तिने आरोपीला विचारलं असता त्याने दिलेलं उत्तर ऐकून ती हादरलीच. दानिशने कथितपणे तिला सांगितलं की, जर कोणीच लग्न करण्यास तयार झालं नाही ती त्यांच्या जमातीच्या इमाम साहिबांशी लग्न करू शकते.

आरोपी तिचे नाव आणि धर्म बदलण्याचा कट रचत होते, असाही दावा पीडितेने केला. धर्मांतराची प्रक्रिया सार्वजनिक झाल्यास आपण पकडले जाऊ, अशी भीतीही आरोपींना वाटत होती, असंही तिने जबाबात म्हटल्याचं समोर आलं.

लग्नाचं सत्य समजताच वाद

पीडितेच्या जबाबानुसार, फेब्रुवारी 2026 मध्ये तिला एका अनोळखी नंबरवरून व्हॉट्सॲपवर कॉल आणि मेसेज आले. जेव्हा तिने तो नंबर दानिशला दाखवला, तेव्हा त्याने तो त्याचा घरचा नंबर असल्याचे सांगितले. नंतर दानिशने तो त्याच्या पत्नीचा नंबर असून त्याला दोन



मुले असल्याचे कबूल केलं,असा आरोप पीडितेने केला. ते ऐकून पीडित तरूणी हैराण झाली. जेव्हा लोक तिला त्याच्या लग्नाबद्दल सांगायचे, तेव्हा तो तिला त्याकडे दुर्लक्ष करायला सांगायचा. सत्य समोर आल्यास ती त्याला सोडून जाईल या भीतीने मी घाबरलो, असं दानिशने तिला सांगितल्याचं पीडितेने म्हटलं.

इमाम साहेबांशी लग्न कर

आता माज्याशी लग्न कोण करणार, असाव पीडितेने त्याला विचारला. तेव्हा दानिशने कथितपणे सांगितले की त्यांच्या समाजात बहुपत्नीत्व सामान्य आहे आणि तो तिच्यासाठी कोणीतरी शोधून देईल. अगदीच जर कोणी सापडलं नाही तर तू आमच्या समाजातील इमामशी लग्न करू शकतेस, असंही दानिशने सांगितल्याचा आरोप पीडितेने केला. इमाम साहेब म्हणजे कोण असंही तिने दानिशला विचारला. तेव्हा दानिशने तिला सांगितले की ते त्यांच्या जमातीचे इमाम आहेत आणि त्यांची पत्नी एका मदरशात शिकवते व ती तिला इस्लामचे नियम आणि अरबी भाषा शिकवू शकते.

नामबदल आणि कागदपत्रं जमवण्याचा प्लान

याशिवाय, पीडितेने असा आरोप केला की, आरोपी तौसीफ अत्तारने तिला धर्मांतर करण्यास भाग पाडण्यासाठी मालेगावच्या एका टोळीचा उल्लेख केला होता. चार्जशीटनुसार , त्यानंतर दानिशने तिला तिची मूळ कागदपत्रे कंपनीत आणण्यास सांगितले. दानिशच्या सांगण्यावरून तिने तिची सर्व मूळ कागदपत्रे आणून त्याच्या बॅगेत ठेवली, असं पीडितेने पोलिसांना सांगितलं. तिच्या नावावर नवीन कागदपत्रे तयार झाली की तू नोकरीसाठी बाहेर जात आहेस, अस पालकांना सांग, असा सल्लाही दानिशने पीडितेला दिल्याचे तिने नमूद केलं.

मुंबई आणि मलेशियाला पाठवण्याची कथित चर्चा

दानिश आणि तौसीफ यांनी पीडितेच्या धर्मांतराविषयी कोणालाही कळू नये म्हणून मुंबईत तिच्यासाठी नोकरी शोधण्याबाबतही चर्चा केली होती, असं पीडितेने दिलेल्या जबाबात सांगितलं. एवढंच नव्हे तर तौसीफने तिला मलेशियाला पाठवण्याचाही सल्ला दिल्याचा आरोप तिने केला. जोपर्यंत तिला नोकरी मिळत नाही, तोपर्यंत ती त्याच्या नातेवाईकाकडे राहू शकते आणि तिथे इस्लामी प्रथांचे पालन सुरू ठेवू शकते असंही तौसीफने तिला सुचवल्याचं पीजितेने सांगितलं.

दानिशने पीडितेचं, त्याच्या पहिल्या पत्नीशी, माहिरीनशी बोलणं करून दिलं होतं. नंतर, व्हॉट्सपवरील संभाषणात, माहिरिनने तिला भेटण्याची आणि इस्लामबद्दल काही गोष्टी समजावून सांगण्याची इच्छा व्यक्त केली असा आरोप पीडितेने केला. मात्र माहिरिनला आपलं बदललेले नाव कसे कळलं याबद्दल काळजी वाटत असल्याने पीडितेने ही भेट टाळली.

चार्जशीटमध्ये अनेक आरोपींची नावं

या कंपनीतील लैंगिक शोषण आणि कथित धर्मांतरण प्रकरणात यापूर्वीच अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये दानिश शेख, तौसीफ अत्तार आणि निदा खान यांचा समावेश आहे. एआयएमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांचेही नाव आरोपपत्रात आरोपी म्हणून नमूद करण्यात आले आहे.त्यांनी निदा खानला आश्रय दिला होता असा तपास यंत्रणांचा आरोप आहे . महाराष्ट्र सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी एक विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपपत्रात 100 हून अधिक साक्षीदारांचे जबाब समाविष्ट आहेत. कोणत्याही प्रकारच्या छळ आणि जबरदस्तीविरोधात त्यांचे शून्य-सहिष्णुता धोरण आहे आणि या प्रकरणात नाव असलेल्या कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याचं टीसीएसने म्हटलं होतं.

कंपनीतील धर्मांतर प्रकरणी निदा खानची कबुली

देशभरात चर्चेत असलेल्या टीसीएस कंपनीतील धर्मांतर आणि लैंगिक शोषण प्रकरणाला आता नवं वळण मिळाल्याचे पहायला मिळत आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी निदा खान हिने कबुली दिली आहे. तिने धर्मांतर करण्यासाठी प्रयत्न केल्याची कबुली दिली आहे. निदा खान हिच्या जबाबासह काही गंभीर बाबी विशेष तपास पथकाने दाखल केलेल्या दोषारोपपत्रात नमूद करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित गुन्ह्यांच्या खटल्याची पहिली सुनावणी ९ जून रोजी होणार असल्याने प्रकरणाकडे लक्ष लागले आहे.

तपासाशी संबंधित सूत्रांच्या माहितीनुसार, रक्कळने न्यायालयात सादर केलेल्या दोषारोपपत्रात, पीडित तरुणींचे धर्मांतर घडवून आणण्यासाठी त्यांच्यावर मानसिक प्रभाव टाकण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा करण्यात आला आहे. यामध्ये काही धार्मिक प्रचारकांचे व्हिडिओ पाहण्यास प्रवृत्त करण्यात आल्याचा उल्लेख असल्याचे सांगितले जात आहे. तपास यंत्रणेनुसार,



संशयित आरोपी निदा खान हिने चौकशीत काही लिंक पाठवल्याचा उल्लेख कथित जबाबात असल्याचा दावा करण्यात आला आहे.

'ब्रेनवॉश'चा आरोप; मानसिक दबाव टाकल्याचा दावा

देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याच्या तपासात पीडित तरुणीच्या मनात तिच्या धर्माबद्दल संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा तपासात समोर आला आहे. दोषारोपपत्रानुसार, पीडितेला विशिष्ट धार्मिक विचारसरणीशी संबंधित व्हिडिओ पाहण्यासाठी सातत्याने दबाव टाकण्यात आल्याचा आरोप आहे. ''धर्म स्वीकारल्यास मानसिक तणाव कमी होईल,'' अशा स्वरूपाचे समुपदेशन किंवा संवाद झाल्याचाही दावा तपासात नमूद करण्यात आल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

याच प्रकरणात संशयित आरोपी दानिश शेख याच्यावर पीडितेला लग्नाचे आश्वासन देत शारीरिक व लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. तसेच पीडितेच्या पोशाखाबाबतही निर्बंध लादल्याचा दावा दोषारोपपत्रात करण्यात आला आहे. तिला विशिष्ट प्रकारचे कपडे परिधान करण्यास सांगण्यात आले तसेच धार्मिक पोशाख वापरण्याबाबत मार्गदर्शन केल्याचाही उल्लेख असल्याचे समोर आले आहे.

पाकिस्तान कनेक्शनचा दावा

या प्रकरणात काही पाकिस्तानी धार्मिक व्यक्तींशी संबंधित डिजिटल कंटेंटचा उल्लेख तपासात समोर आल्याचा दावा केला जात आहे. मात्र, तपास यंत्रणांनी अद्याप कोणतेही अधिकृत निष्कर्ष सार्वजनिकरीत्या जाहीर केलेले नाहीत. त्यामुळे या बाबींची सत्यता न्यायालयीन प्रक्रियेत स्पष्ट होणे बाकी आहे.

दरम्यान, नाशिकमधील मुंबई नाका पोलीस ठाण्यात दाखल विविध गुन्ह्यांप्रकरणी ९ जून रोजी होणारी सुनावणी महत्त्वाची मानली जात असून, तपासातून आणखी कोणते खुलासे समोर येतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पुण्यात मध्यरात्री रेव्ह पार्टीवर पोलिसांचा छापा

६० ते ७० तरुण-तरुणी ताब्यात, अमली पदार्थांचा संशय



■पुणे। प्रतिनिधी,

पुण्यात पुन्हा एकदा कथित रेव्ह पार्टीचा पर्दाफाश झाला असून गुन्हे शाखेच्या पथकाने मध्यरात्री टाकलेल्या छाप्यात मोठी कारवाई केली आहे. आळंदी-मरकळ रस्त्यावरील एका खासगी रिसॉर्टमध्ये सुरू असलेल्या या पार्टीतून पोलिसांनी मोठ्या प्रमाणात दारू आणि संशयास्पद पदार्थ जप्त केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका खासगी बंगल्यात या पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. "प्रोजेक्ट एक्स हाऊस पार्टी" या नावाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात अनेक तरुण-तरुणी सहभागी झाल्याचे समोर आले आहे. पाटीर्साठी सोशल मीडिया आणि खास संपर्काच्या माध्यमातून निमंत्रणे देण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

गुन्हे शाखेला या कार्यक्रमाबाबत गुप्त माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी अचानक छापा टाकला. कारवाईदरम्यान अनेक जण नशेच्या अवस्थेत आढळल्याचे सांगितले जात आहे. तसेच घटनास्थळावरून काही संशयास्पद अमली पदार्थ आणि विनापरवाना दारूचा साठा जप्त करण्यात आला आहे. जप्त केलेल्या पदार्थांची तपासणी करण्यासाठी नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहेत. या कारवाईत सुमारे ६० ते ७० तरुण-तरुणींना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांची ओळख, पाटीर्तील सहभाग आणि अमली पदार्थांशी संबंधित कोणताही संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे. पोलिस आता या कार्यक्रमाचे आयोजक कोण होते, पार्टीसाठी आर्थिक मदत कोणी केली, तसेच अमली पदार्थांचा पुरवठा कुठून झाला याचा शोध घेत आहेत. रिसॉर्ट व्यवस्थापनाची भूमिकाही तपासली जात असून संबंधितांकडून माहिती गोळा करण्यात येत आहे. या घटनेमुळे पुण्यात पुन्हा एकदा रेव्ह पार्टी आणि अमली पदार्थांच्या वापराबाबत चर्चा सुरू झाली आहे. प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून चौकशीनंतर आणखी माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

नागपूरच्या दर्ग्यात महिलेचा विनयभंग आणि धर्मांतरासाठी सक्ती... ६ जणांवर गुन्हा

■नागपूर। प्रतिनिधी,

नागपूर जिल्ह्यातील एका दर्ग्यात घडलेल्या कथित सक्तीच्या धर्मांतराच्या प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. कोलकाता येथून उरूस उत्सवासाठी आलेल्या एका महिलेने दर्ग्यातील काही व्यक्तींवर सक्तीने धर्मांतर करण्याचा प्रयत्न, विनयभंग, धमक्या आणि बेकायदेशीरपणे डांबून ठेवल्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणी दर्ग्याच्या मुख्य काळजीवाहकासह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपासासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे.

उरूससाठी नागपुरात आगमन, अन् घडला धक्कादायक प्रकार

: पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला पश्चिम बंगालमधील कोलकात्याच्या दमदम परिसरातील रहिवासी आहे. ती १८ एप्रिल रोजी नागपूरजवळील हुजूर मरियम अम्मा दर्ग्यात आयोजित वार्षिक उरूस उत्सवात सहभागी होण्यासाठी आली होती. महिलेच्या तक्रारीनुसार, १८ ते १९ एप्रिलदरम्यान तिला दर्गा परिसरात जबरदस्तीने रोखून ठेवण्यात आले. याच काळात तिच्यावर धर्मांतर करण्यासाठी दबाव टाकण्यात आला. धर्मांतरास नकार दिल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशा धमक्या देण्यात आल्याचा आरोपही तिने केला आहे.



- **शारीरिक आणि मानसिक छळाचा आरोप :** पीडित महिलेने आपल्या तक्रारीत शारीरिक व मानसिक छळ झाल्याचा तसेच विनयभंग झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. काही आरोपींनी तिच्यावर दबाव टाकत धर्मांतराची प्रक्रिया स्वीकारण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केल्याचे तिने म्हटले आहे. घटनास्थळावरून कसाबसा सुटका करून घेतल्यानंतर ती कोलकात्याला परतली. तेथे वैद्यकीय उपचार घेतल्यानंतर तिने दमदम पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.
- **झिरो एफआयआरनंतर नागपुरात गुन्हा दाखल :** महिलेची तक्रार प्रथम कोलकात्यात झिरो एफआयआर म्हणून नोंदवण्यात आली. त्यानंतर प्रकरण संबंधित अधिकारक्षेत्रात येत असल्याने ते नागपूर ग्रामीणमधील कान्हान पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले. नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोहरे यांनी सांगितले की, तक्रार प्राप्त होताच तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात आली. पीडितेचा सविस्तर जबाब नोंदवण्यासाठी पोलिसांचे विशेष पथक कोलकात्याला पाठवण्यात आले आहे.
- **सहा आरोपींवर गंभीर कलमांखाली गुन्हा :** तक्रारीच्या आधारे कान्हान पोलिसांनी हल्ला, विनयभंग, धमकी, हत्येचा प्रयत्न आणि सक्तीच्या धर्मांतरासंदर्भातील विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील आरोपींमध्ये ताजी जनवीरद्दीन, ताजी मुस्तफाफिरुद्दीन फैज, तेजस खोब्रागडे, बशरा फातिमा ताजी, मल्ला धुळे आणि अन्य एका व्यक्तीचा समावेश आहे. आरोपींपैकी दोन महिला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.
- **एसआयटी मार्फत तपास; इलेक्ट्रॉनिक पुरावे जप्त :** प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. तपासादरम्यान काही इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली असून ती न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवण्यात आली आहेत. या तपासातून आणखी महत्त्वाचे पुरावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या घटनेमुळे नागपूरसह राज्यभरात चचेर्ला उधाण आले असून पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

खारघरमध्ये महामार्गालगत महिलेचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळला...

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

नवी मुंबईतील खारघर परिसरात एक अत्यंत धक्कादायक आणि गूढ घटना उघडकीस आली आहे. शनिवारी मुंबई-पुणे महामार्गाच्या कडेला एका अज्ञात महिलेचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली असून, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत या प्रकरणाच्या सखोल तपासाला सुरुवात केली आहे.

ही घटना गजबजलेल्या महामार्गावर भरदिवसा उघडकीस आली. या घटनेचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये स्पष्ट दिसत आहे की, महामार्गावरून वाहनांची



कर्ज फेडण्यासाठी निर्घृण हत्या

तुर्भे येथील हत्येचे गूढ पोलिसांनी अत्यंत वेगाने तपास करत अवघ्या २४ तासांत उकलले होते. या प्रकरणी ३८ वर्षीय मोबिन नूर मोहम्मद कुरेशी याला अटक करण्यात आली आहे. पोलीस तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, १८ मे रोजी अझरुन्निसा या भाजी आणण्यासाठी घराबाहेर पडल्या होत्या. त्यावेळी कर्जाच्या ओज्याखाली दबलेल्या आरोपी कुरेशीने त्यांना चहा पिण्याच्या बहाण्याने आपल्या घरी बोलावले. त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने लुटून आपले कर्ज फेडण्याचा त्याचा मनसुबा होता. मात्र, वृद्धेने त्याला कडाडून विरोध करत आरडाओरडा सुरू केल्याने, आरोपीने अत्यंत निर्घृणपणे त्यांचा गळा दाबून खून केला.

सतत ये-जा सुरु असतानाच पोलीस कर्मचारी या महिलेचा मृतदेह रुग्णवाहिकेत ठेवत आहेत. अद्याप या मृत महिलेची ओळख पटलेली नाही, तसेच तिचे वय किंवा मृत्यूचे नेमके कारणही समजू शकलेले नाही. या प्रकरणामागे काही घातपात आहे का, याचा पोलीस कसून शोध घेत आहेत. मृत्यूमागचे नेमके कारण शोधण्यासाठी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

तुर्भे येथील वृद्धेच्या हत्येची ताजी घटना

नवी मुंबईत महिलांच्या सुरक्षेबाबत चिंता वाढवणारी ही काही पहिलीच घटना नाही. अवघ्या काही दिवसांपूर्वीच तुर्भे परिसरातील शिवशक्ती नगरमध्ये असाच एक भयानक प्रकार समोर आला होता. तिथे एका ६६ वर्षीय वृद्ध महिलेचा मृतदेह चक्क एका पोत्यात कोंबून फेकलेल्या अवस्थेत सापडला होता. अझरुन्निसा अब्दुल वाहीद खान असे या दुदैर्वी महिलेचे नाव होते. या हत्याकांडाची शाई वाळत नाही तोच आता खारघरमध्ये हा दुसरा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

सीसीटीव्ही आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी गजाआड

हत्या केल्यानंतर आरोपीने पुरावे नष्ट करण्याच्या हेतूने अझरुन्निसा यांचा मृतदेह पोत्यात भरून फेकून दिला होता. मात्र, पोलिसांनी अत्यंत शिताफीने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि स्थानिक गुप्तचरांच्या मदतीने आरोपीच्या मुसक्या आवळल्या. तुर्भे प्रकरणातील आरोपीला गजाआड करण्यात पोलिसांना यश आले असले तरी, आता खारघरमध्ये सापडलेल्या अज्ञात महिलेच्या मृत्यूचे गूढ सोडवण्याचे एक नवे आणि मोठे आव्हान नवी मुंबई पोलिसांसमोर उभे राहिले आहे. आता सर्वांचे लक्ष या महिलेच्या वैद्यकीय आणि शवविच्छेदन अहवालाकडे लागले असून, त्यानंतरच या नव्या प्रकरणाचा पूर्ण उलगडा होऊ शकेल.

नाशिकचा आणखी एक भामटा ज्योतिषी समोर

'ज्योतिषा'चे थेट दुबई कनेक्शन

■नागपूर । प्रतिनिधी,

नाशिक पोलिसांच्या रडारवर सध्या एक नाव चर्चेत आहे ते म्हणजे सचिन देशमुख! स्वतःला ज्योतिषी म्हणवणारा, हनुमान भक्त असल्याचा दावा करणारा हा व्यक्ती आता एका मोठ्या आर्थिक घोटाळ्यामुळे पोलिसांना हवा आहे. कारण, श्रद्धा आणि भविष्याच्या नावाखाली त्याने शेकडो लोकांना कोट्यवधींचा गंडा घातल्याचा आरोप आहे.



नाशिकमध्ये अंजनीय ज्योतिष नावाने कार्यालय

नाशिकमधील शरणपूर रोड परिसरात 'अंजनीय ज्योतिष' नावाने कार्यालय चालवणाऱ्या सचिन देशमुखने लोकांचा विश्वास जिंकला. भविष्य सांगण्याच्या माध्यमातून त्याने अनेकांना शेअर मार्केटमध्ये मोठ्या परताव्याचं आमिष दाखवलं. विश्वास इतका बसला की तब्बल 321 जणांनी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक त्याच्या माध्यमातून केली. ही रक्कम काही लाखांत नव्हती तर ती थेट 36 कोटी 32 लाख रुपये होती. मात्र धक्कादायक बाब म्हणजे, ही रक्कम शेअर मार्केटमध्ये गुंतवलीच गेली नाही. उलट हा पैसा हडप करण्यात आल्याचं सायबर पोलिसांच्या तपासात समोर आलं आहे. या प्रकरणाचा पहिला संशय एका किराणा दुकानदाराला आला. देशमुखने त्यालाही शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडत तब्बल 73 लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. संशय आल्यावर दुकानदाराने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि त्यानंतर या संपूर्ण घोटाळ्याचा पदार्फाश झाला.

सचिन देशमुख विरोधात लूकआऊट नोटीस

धक्कादायक म्हणजे, तक्रारींचा आकडा वाढतच गेला. आतापर्यंत 329 जणांच्या तक्रारी पोलिसांकडे दाखल झाल्या असून, फसवणुकीची व्याप्ती दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. दरम्यान, पैसे घेऊन सचिन देशमुख फरार झाला असून तो दुबईत लपल्याचा पोलिसांना संशय आहे. त्याच्या विरोधात लूकआऊट नोटीस जारी करण्यात आली असून सायबर पोलीस त्याच्या मागावर आहेत.

श्रद्धा, ज्योतिष आणि मोठ्या नफ्याचं आमिष या तिन्ही गोष्टींचा वापर करून लोकांना जाळ्यात ओढल्याचा आरोप असलेल्या या प्रकरणामुळे नाशिकमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

आभाळ भरून येते, पण पाऊस?

मशागतीची कामे पूर्ण करून शेतकरी पेरणीसाठी सज्ज आहे; मात्र आकाशाकडे लागलेल्या नजरा आणि पावसाची अनिश्चितता यामुळे चिंता वाढत आहे. दुसरीकडे वाढती पाणीटंचाई आणि उन्हाची तीव्रत हाल वाढवत आहे.

जून महिना सुरू होऊन आज सहावा दिवस उजाडला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार मान्सून केरळमध्ये दाखल झाला असून कर्नाटकातही त्याचे आगमन झाले आहे. तसेच दोन दिवसांपूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यातही पावसाने हजेरी लावली आहे. आता १० जूनपर्यंत राज्याच्या इतर भागांतही मान्सून दाखल होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. असे असले तरी राज्यातील शेतकरी राजा अजूनही आकाशाकडे डोळे लावून पावसाची आतुरतेने वाट पाहत आहे. अधूनमधून ढग दाटून येत असून पाऊस येण्याचे संकेत मिळत आहेत; मात्र त्याबाबत निश्चितता नाही. परिणामी नागरिकांना कडक उन्हाचा सामना करावा लागत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, शेतकऱ्यांनी शेतातील मशागतीची कामे पूर्ण केली असूनही पावसाअभावी बियाण्यांची पेरणी रखडली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत असून त्याची ही चिंता दूर करण्यासाठी पावसाचे दमदार आगमन होणे अत्यंत गरजेचे आहे. याचबरोबर अनेक भागांत पाणीटंचाईची समस्या गंभीर होत चालली आहे. गावांमध्ये शासकीय नळयोजना असली तरी एक दिवसाआड केवळ अर्धा तास पाणीपुरवठा होत आहे. काही ठिकाणी संबंधित कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे सात-आठ दिवस सार्वजनिक नळांना पाणी आलेले नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक आणि शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. मागील वर्षी याच काळात शेतकऱ्यांची लावणी सुरू झाली होती; मात्र नंतर पावसाने दडी मारल्याने अनेकांचे नुकसान झाले. यंदा मात्र त्याउलट परिस्थिती पाहायला मिळत आहे. त्यामुळे शासनाने चार-पाच वर्षांनी कर्जमाफी जाहीर करण्याऐवजी प्रत्येक आर्थिक वर्षात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण करून तातडीने नुकसानभरपाई देण्याची प्रभावी यंत्रणा विकसित करावी. अशा प्रकारे वेळेवर मदत मिळाल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळेल आणि सरकारी तिजोरीवरही अतिरिक्त भार पडणार नाही. तसेच शेती क्षेत्रातील समस्यांवर दीर्घकालीन आणि परिणामकारक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. कारण शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून खऱ्या अर्थाने तोच देशाचा अन्नदाता आणि राजा आहे. शासनाच्या नवीन धोरणानुसार रुपये २५ हजारांपेक्षा जास्त वेतन असलेल्या व्यक्ती, आयकर भरणारे नागरिक तसेच सरकारी नोकरीतील कर्मचाऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही. हे धोरण योग्य असले तरी नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य कारणांमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणे अत्यंत आवश्यक आहे. दुर्दैवाने अनेक ठिकाणी ही मदत वेळेवर पोहोचत नाही. अशा परिस्थितीत ज्या ठिकाणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत मदत वेळेत पोहोचलेली नसेल, तेथील संबंधित अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई करण्यात यावी. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळण्यास मदत होईल. याच आनुषंगाने, "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेप्रमाणेच ''मुख्यमंत्री लाडके शेतकरी'' ही योजना सुरू करण्यात यावी. शेतकऱ्यांसाठी आधीच अनेक योजना उपलब्ध आहेत, मग नव्या योजनेची गरज काय, असा प्रश्न अनेकांना पडू शकतो; परंतु जर विद्यमान योजना पुरेशा आणि प्रभावी असतील, तर शेतकऱ्यांवर आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ का येते? शेतकरी आत्महत्यांची कारणे शोधण्यासाठी जवळपास १५ लाख रुपये खर्च करून अहवाल तयार करण्यात आला. तरीदेखील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी झालेले दिसून येत नाही. ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांचे संरक्षण आणि सक्षमीकरण करणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षितता, वेळेवर मदत, योग्य मोबदला आणि संकटाच्या काळात त्वरित आधार मिळावा यासाठी ''मुख्यमंत्री लाडके शेतकरी'' योजनेसारखे स्वतंत्र आणि प्रभावी उपक्रम राबविण्याची आज नितांत गरज आहे. शेती हे भारतातील बहुसंख्य लोकांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन असून भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रभावी उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. महागाई निदेर्शांकाचा विचार करून राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये शेतकऱ्यांसाठी विशेष "खते खाते" सुरू करण्यात यावे व त्यात नियमित आर्थिक सहाय्य जमा करण्यात यावे. यामुळे शेतीसाठी आवश्यक खते व इतर साहित्य खरेदी करणे सुलभ होईल आणि शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत मिळेल. तसेच नैसर्गिक आपत्तींचा सर्वाधिक परिणाम शेतकरी वर्गावर होत असल्याने अशा परिस्थितीतही वेळेवर आर्थिक मदत उपलब्ध होणे आवश्यक आहे. या उपायांमुळे शेती क्षेत्र अधिक सक्षम होऊन राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळू शकेल. अनेक शासकीय योजना अस्तित्वात असल्या तरी त्यांचा अपेक्षित लाभ अनेकदा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे कृषी विभागाने अधिक सतर्क आणि कार्यक्षम राहणे गरजेचे आहे. कृषी विभागाने वेळोवेळी शासनाला अचूक व पुरेशी माहिती उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून योग्य निर्णय घेता येतील. तसेच, शेतकऱ्यांसाठी नियमित मेळावे, कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून आधुनिक शेती तंत्रज्ञान, उत्पादनवाढीच्या पद्धती आणि बाजारपेठेतील संधी यांविषयी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. नवीन व सुधारित बी-बियाणे, कीटकनाशके, खते आणि इतर कृषी साधनांची अचूक माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणेही तितकेच महत्त्वाचे आहे. याशिवाय, शेतकऱ्यांच्या समस्या व शंकांचे समाधानकारक निराकरण करून त्यांना आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय सहाय्य उपलब्ध करून देणे ही कृषी विभागाची महत्त्वाची जबाबदारी आहे. अशा सर्वसमावेशक उपाययोजनांमुळे शेती क्षेत्र अधिक सक्षम होईल आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास निश्चितच मदत होईल. अजूनही राज्यात मान्सूनचे आगमन झालेले नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. पेरणीनंतर पुरेसा पाऊस न झाल्यास पिकांच्या वाढीवर परिणाम होऊन उत्पादन घटू शकते. त्यामुळे शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. हवामानातील बदल, ढगांची स्थिती आणि वाऱ्याचा वेग यावर शासनाकडून लक्ष ठेवले जात असून ही माहिती विविध माध्यमांतून दिली जाते. शेती हंगामात शेतकऱ्यांना अचूक व वेळेवर हवामानविषयक माहिती मिळणे आवश्यक आहे. कृषी विभाग आणि हवामान विभागाने नियमित मार्गदर्शन करून संभाव्य धोके व बदलांची माहिती तातडीने द्यावी. मोबाईल व डिजिटल माध्यमांमुळे ही माहिती जलद पोहोचू शकते. पावसाच्या आगमनाला काहीसा विलंब होत असला तरी अनेकदा अनुभवाच्या जोरावर शेतकऱ्यांचे अंदाजही अचूक ठरतात. संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी स्थानिक परिस्थितीनुसार योग्य पिके आणि बियाण्यांची निवड करून पेरणी करावी. सध्या शेतकरी राजा पावसाच्या प्रतीक्षेत असला तरी लवकरच राज्यात मान्सूनचे आगमन होईल आणि शेतकरी नव्या उत्साहाने शेती हंगामाच्या कामांना सुरुवात करतील, अशी अपेक्षा आहे.


इस्लाम : भारतातील एक आधुनिक 'अस्पृश्य'

शाळांना सुटी असल्याने मुलांची आणि नागरिकांची गर्दी होते म्हणून पुण्यातील सारसबाग दिनांक २८ आणि २९ मे, २०२६ रोजी बंद ठेवण्यात आली. संपूर्ण मे महिना मुलांना, शनिवारी-रविवारी पालकांना सुटी असतांना याच दिवशी बाग बंद का? प्रतिबंधात्मक आदेश लागू होते असे म्हणावे तर सारसबागच बंद का? सारसबागेतील मंदिर चालू कसे? या प्रश्नांची अधिकृत आणि तर्कसंगत उत्तरे कोणतीही यंत्रणा देणार नाही. दिनदर्शिकेतील २८ मे, २०२६ या तारखेत या प्रश्नांची उत्तरे मिळतील. या दिवशी नेमका बकरी ईद हा सण होता. मुस्लिम बांधव आपला सण साजरा करून बागेत फिरायला येत असतात. त्यांना बागेपासून 'दूर' ठेवण्यासाठी हा 'सारसबाग बंद'चा खटाटोप. यावरून मुस्लिमांना बहिष्कृत करून 'दूर' ठेवण्याच्या प्रक्रियेचा हा एक भाग आहे ही शंका खरी ठरते. या विषयावर एक दृष्टिक्षेप टाकू या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'अस्पृश्य पूर्वी कोण होते?' या शोधग्रंथात अस्पृश्यतेवर महत्त्वाचे निष्कर्ष काढलेले आहेत. अस्पृश्यतेचा कलंक दूर करण्यासाठी संविधानात अनुच्छेद १७ मध्ये विशेष तरतूद करून कायद्याने अस्पृश्यता संपुष्टात आणली आहे. परंतु, गेल्या दहा-बारा वर्षांपासून, आपल्या डोळ्यासमोर धर्मनिरपेक्षता, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या संवैधानिक मूल्यांना पायदळी तुडवून, अस्पृश्यतेच्या कटू इतिहासाची पुनरावृत्ती होतांना पहावे लागत आहे. या वेळी अस्पृश्य होऊ घातलेला वर्ग आहे भारतातील मुस्लिम. धार्मिक विद्वेषाच्या आधारावर मतांचे ध्रुवीकरण करून सत्तेत आलेल्या पक्षाचा आणि संलग्न संस्था-संघटनांचा मुस्लिम-द्वेषयुक्त अजेंडा आणि त्याची कठोर अंमलबजावणी, त्याकडे सरकारने जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, यामुळे भारतीय मुस्लिम आधुनिक अस्पृश्य जमात होऊ घातला आहे.

विशेष म्हणजे डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्य जातीच्या उत्पत्तीची जी कारणे सांगितली आणि आता मुस्लिमांना बहिष्कृत करण्यासाठी वापरली जाणारी पद्धत, यात कमालीचे साम्य दिसून येते. भारतातील अस्पृश्य हे त्या काळी युद्धात पराभूत झालेले उद्ध्वस्त लोक (ब्रोकन मेन) होते. म्हणून त्यांना गावाबाहेर ठेवले गेले, ते गोमांस भक्षण करायचे म्हणून त्यांना अपवित्र, अस्पृश्य ठरवले गेले, त्यांच्याशी रोटी-बेटी व्यवहार बंद केला गेला आणि त्यांना आताच्यासारखे मूलभूत अधिकार, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांपासून वंचित ठेवले गेले. अगदी तेच तंत्र वर्तमानात मुस्लिमांच्या बाबतीत धर्मांध शक्तीद्वारा वापरले जात आहे. त्यासाठी पूर्वीच्या काळात उपलब्ध नसलेल्या आणि आता मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या माध्यमांचा वारेमाप वापर केला जात आहे.

मुस्लिम-मोगल लोकांनी भारतवर्षावर सहाशेहून अधिक वर्षे राज्य केल्यानंतर त्यांची सत्ता लयाला गेली. त्या अथार्ने ते पराभूत, उद्ध्वस्त लोक (ब्रोकन मेन) ठरतात. एकदा त्यांच्यावर अस्पृश्यता लादायची आहे म्हटल्यावर त्यांच्याविषयी मोठ्या प्रमाणात तिरस्कार, द्वेष, क्रोध, वैर, भय निर्माण करणे आवश्यक होते. मग, सगळे बादशाह कसे हिंदू-द्वेष्टे होते, त्यांच्या राजवटीत हिंदूवर किती अत्याचार केले, हिंदू धर्म बुडवण्याचा त्यांनी कसा प्रयत्न केला, याच्या खऱ्या-खोट्या कहाण्या प्रसारित करून, हेट स्पीच करून लोकांमध्ये क्रोध, द्वेष निर्माण केला गेला. मुस्लिम महिलांवरील बलात्कार काही कथित संतांकडून योग्य ठरवले गेले. 'त्यांचे' लोक चार बायका करून, प्रत्येक बायकोच्या पोटी चार चार मुले जन्माला घालून त्यांची लोकसंख्या वाढवणार आणि आपण आपल्याच देशात अल्पसंख्यांक होणार असे काल्पनिक भय लोकांच्या गळी उतरवले.



समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय नाकारलेला, जवळजवळ सर्वच क्षेत्रात बहिष्कृत, तिरस्कृत केलेला भारतीय इस्लाम आता आधुनिक अस्पृश्य जमात होऊ घातला आहे. जग मानवी मूल्यांचा आदर करत असतांना आपला देश मात्र मध्ययुगाकडे जातोय हे यातनादायी आहे.

अफगाणिस्तान, सिरिया, पाकिस्तान आदी इस्लामी देशांत आतंकवाद फोफावला. आपल्याकडे काही मुस्लिम समाजातील तरुण आतंकवादी पकडले गेले. परंतु इथले सगळेच मुसलमान आतंकवादी असतात, असे सरसकट नरेटीव्ह जाणीवपूर्वक पसरवले गेले. त्यासाठी इस्लामी देशातील आतंकवाद्यांचे हिंस्र व्हिडिओ एडिट करून प्रसारित केले गेले.

मुस्लिम लोक गोमांसभक्षण करतात आणि गाय तर आपली पवित्र माता, असे सांगून त्यांच्याविषयी द्वेषाची पेरणी केली. ईशान्येकडील राज्ये, तसेच गोवा राज्यात हिंदूंसह अन्य गैर-मुस्लिम लोकही गोमांस भक्षण करत असतांना, मुस्लिम लोक गोमांसभक्षण करतात म्हणून त्यांचा मात्र तिरस्कार केला जातो. यातून मुस्लिमांनी गोमांस बाळगल्याच्या खोट्या आरोपावरून त्यांचे मॉब लिंचिंग केल्याची उदाहरणे घडली.

अस्पृश्यांचे स्थान गावाबाहेर असते. आता मुसलमानांना आपल्या वस्तीत, सोसायटीत कोणीही हिंदू भाड्याने किंवा विकत घर देत नाही. अगदी महानगरांमध्येही हीच स्थिति आहे. कित्येक मुस्लिम सेलिब्रिटींना याची झळ बसल्याच्या बातम्या येत असतात. गृह संकुलांमध्ये त्यांना जागा देऊ नये, असे अलिखित ठराव केले जातात. त्यामुळे या लोकांना 'आपली' वस्ती गाठावी लागते. वेगवेगळ्या जातीचे 'वाडे' असतात असा आता मुसलमानवाडा निर्माण झाला आहे आणि हे लोक अस्पृश्यांप्रमाणे 'गावाबाहेर' फेकले गेले आहेत.

हिंदू-मुस्लिम आंतरधर्मीय विवाह आपल्या देशाला नवीन नाहीत. तरीही 'लव्ह जिहाद' ही संकल्पना आणली गेली. मुस्लिम तरुण हजारो हिंदू तरुणींना फूस लावून त्यांच्याशी लग्न करतात, त्यांना जबरदस्तीने मुस्लिम, अतिरेकी बनवतात असा अपप्रचार केला जातो आहे. अशा काही तुरळक घटना घडल्याही असतील. परंतु प्रचारकी चित्रपटांनी त्याचे भयावह चित्र उभे केले. त्यामुळे, मुस्लिमांविषयीचा तिरस्कार अधिक तीव्र झाला. याचे पुढचे पाऊल म्हणजे काही राज्यात आंतरधर्मीय विवाह रोखण्यासाठी कडक कायदे करून असे विवाह अवघड करून टाकले आहेत. मुस्लिमांसोबत 'बेटी-बंदी' झाल्यात जमा आहे.

मुस्लिमांच्या हॉटेलातले पदार्थ, त्यांच्या फळांच्या गाड्यांवरील फळे खाऊ नयेत कारण ते लोक अन्नावर, फळांवर थुंकतात असे दर्शविणारे खरे खोटे व्हिडिओ प्रसारित केले जाऊ लागले. यामुळे मुसमानांचे ढाबे बंद पडू लागले आणि 'रोटी-बंदी' साधली गेली. त्याची पुढची पायरी म्हणजे एकूणच मुसलमानांच्या सर्वच प्रकारच्या सेवांवर, दुकानांवर बहिष्कार टाकला जात आहे. या बहिष्काराचे लोण मुस्लिम कलाकारांच्या सिनेमा, नाटकांवर बहिष्कार टाकण्यापर्यंत गेले आहेत.

मुसलमानांनी गरबा खेळायला येऊ नये म्हणून कार्यक्रमाच्या प्रवेशद्वारावर वराह-पूजन करायला लावणे, चार धाम येथे मुस्लिमांना (गैर-हिंदूंना) प्रवेशबंदीचा प्रस्ताव आणणे, कावड यात्रा मार्गावर लावलेल्या टपऱ्यांवर मालकाचे नाव लिहिण्याचे बंधन घालणे, कुंभमेळ्यात मुस्लिम दुकानांना बंदी, इत्यादी पद्धतीने शक्य होईल तिथे मुस्लिमांना वेगळे पाडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याची परिसीमा म्हणजे मुसलमान जवळपास फिरकू नयेत म्हणून हिंदूंनी काही ठिकाणी, एरवी गलिच्छ मानली जाणारी डुकरे पाळणे सुरू केले.

मुस्लिमांच्या काही वस्त्या बुलडोझर लावून पाडल्या जात आहेत. एखाद्या गुन्ह्यात मुसलमान पकडल्यास त्याचे घर बुलडोझर लावून पडले जाते. एसआयआर अंतर्गत ठोक प्रमाणात मुसलमानांची नावे वगळून त्यांचा मताधिकार डावलला जात आहे. एनआरसी, सीएएमधील अन्यायकारक तरतुदीं विरोधात आवाज उठवणाऱ्या मुस्लिमांवर दहशतवादी, अर्बन नक्षलचा शिक्का मारून यूएपीएअंतर्गत खोट्या प्रकरणात अडकवून वर्षानुवर्षे तुरुंगात डांबले जात आहे.

अशा प्रकारे समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय नाकारलेला, जवळजवळ सर्वच क्षेत्रात बहिष्कृत, तिरस्कृत केलेला 'भारतीय इस्लाम' आता 'आधुनिक अस्पृश्य' जमात होऊ घातला आहे. सारे जग मानवी मूल्यांचा आदर करत असतांना आपला देश मात्र मध्ययुगाकडे जातोय हे अत्यंत यातनादायी आहे. परंतु काही कट्टरपंथी लोक वगळता अन्य बांधवांना मुस्लिमांशी केला जाणारा हा भेदभाव मान्य नाही, हे दिलासादायक आहे.

ख्वाजांच्या गौप्यस्फोटापुढे अणुबॉम्ब फिका



पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी एका मुलाखतीत स्पष्टपणे मान्य केले की, माझे पूर्वज हिंदू होते. एका इस्लामिक राष्ट्राचा संरक्षणमंत्री, ज्याच्या हातात अण्वस्त्रांची किल्ली आहे, त्यानेच जेव्हा आपल्या मुळांची कबुली दिली तेव्हा केवळ पाकिस्तानच नव्हे तर संपूर्ण जग हादरले. हे विधान म्हणजे केवळ वैयक्तिक कौटुंबिक इतिहासाचा उल्लेख नव्हता, तर पाकिस्तानच्या निर्मितीच्या पायावरच घाव घालणारा आघात होता. कारण पाकिस्तानची निर्मितीच मुळात द्विराष्ट्र सिद्धांतावर झाली. हिंदू आणि मुस्लीम ही दोन वेगळी राष्ट्रे आहेत, त्यांची संस्कृती, इतिहास, पूर्वज वेगळे आहेत, या दाव्यावरच १९४७ मध्ये फाळणी झाली. आज त्याच देशाचा संरक्षणमंत्री जेव्हा सांगतो की, आम्ही धर्मांतरित हिंदूंचीच लेकरे आहोत, तेव्हा द्विराष्ट्र सिद्धांताचा कणाच मोडून पडतो. आसिफ यांच्या या एका वाक्याने पाकिस्तानचा अणुबॉम्ब निष्क्रिय झाला, असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

अण्वस्त्रे केवळ युरेनियम आणि प्लुटोनियमवर चालत नाहीत, ती विचारधारेवर, द्वेषावर आणि वेगळेपणाच्या अस्मितेवर उभी असतात. ज्या क्षणी पाकिस्तानचा संरक्षणमंत्रीच सांगतो की आमचे रक्त, आमचे पूर्वज, आमची भूमी एकच आहे, त्या क्षणी भारताविरुद्धचा वैचारिक अणुबॉम्ब निकामी होतो. कारण मग उरतो तो केवळ १९४७ नंतर स्वीकारलेला धमार्चा भेद, जो तलवारीच्या जोरावर किंवा राजकीय सोयीसाठी झाला होता. ही कबुली पाकिस्तानी जनतेसाठीही प्रचंड धक्कादायक आहे. गेली ७९ वर्षे तिथल्या पाठ्यपुस्तकांतून, मशिदींतून आणि लष्करी प्रचारातून हेच शिकवले गेले की हिंदू हे काफिर आहेत, त्यांच्यापासून आम्ही वेगळे आहोत, म्हणूनच पाकिस्तान बनवले. शाळेतल्या मुलाला बिन कासीम हा पहिला पाकिस्तानी म्हणून शिकवले जाते, तर राजा दाहिर हा परकीय शत्रू ठरवला जातो. प्रत्यक्षात सिंधचा राजा दाहिरच त्यांचा खरा पूर्वज होता.

आज संरक्षणमंत्रीच जेव्हा खरे बोलले, तेव्हा सामान्य पाकिस्तानी नागरिकाच्या मनात प्रश्नांचे वादळ उठणे स्वाभाविक आहे. मग आम्ही कोणासाठी लढतो आहोत? काश्मीरचा मुद्दा कशासाठी? भारत हा शत्रू कशासाठी? ज्या हिंदू पूर्वजांचे रक्त आमच्या शरीरात आहे, त्यांच्याच वंशजांवर आम्ही अणुबॉम्ब टाकणार का? या प्रश्नांची उत्तरे पाकिस्तानच्या लष्कराकडेही नाहीत आणि मुल्ला-मौलवींकडेही नाहीत. या विधानाची वेळही अत्यंत महत्त्वाची आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढाकार घेतलेल्या अब्राहम अकॉर्डवर सही करण्यासाठी पाकिस्तानवर दबाव वाढत आहे.

इस्रायलसोबत संबंध सामान्य करणे म्हणजे पाकिस्तानच्या इस्लामिक ओळखीला तडा देणे, असा कट्टरपंथीयांचा आक्षेप आहे. अशा नाजूक काळात संरक्षणमंत्र्यांनी आपले पूर्वज हिंदू होते असे सांगणे म्हणजे पाकिस्तानच्या वैचारिक पायालाच सुरुंग लावण्यासारखे आहे. ट्रम्प यांना हेच हवे आहे. एकदा का पाकिस्तानने आपले मूळ मान्य केले, की इस्लामिक उम्माशी बांधिलकी गळून पडते. मग पाकिस्तान एक सामान्य दक्षिण आशियाई देश उरतो, ज्याचे सांस्कृतिक नाते भारताशी आहे. अब्राहम अकॉर्डवर सही करणे मग सोपे जाते, कारण धार्मिक कट्टरतेचे शस्त्र बोथट होते. ख्वाजा आसिफ यांचे विधान हे चुकून तोंडातून गेलेले शब्द नाहीत. पाकिस्तानी लष्कर आणि राजकीय नेतृत्वाला आता कळून चुकले आहे की द्विराष्ट्र सिद्धांताच्या नशेवर देश चालवणे आता शक्य नाही. अर्थव्यवस्था कोलमडली आहे, आयएमएफच्या दारात कटोरा घेऊन उभे राहावे लागत आहे, बलुचिस्तान पेटला आहे, पख्तून स्वतंत्र होऊ पाहत आहे, आणि भारत मात्र जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनतो आहे. अशा वेळी ७९ वर्षे जपलेला खोटा अभिमान बाजूला ठेवून वास्तव स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही. खरे तर हे विधान संपूर्ण उपखंडासाठी एक नवी पहाट घेऊन येऊ शकते.

जर पाकिस्तानने अधिकृतपणे मान्य केले की आम्हीही याच मातीची लेकरे आहोत, आमचे पूर्वज वैदिक संस्कृतीतून आले आहेत, तर भारत-पाकिस्तान संबंधांचे संपूर्ण रसायनच बदलून जाईल. काश्मीर प्रश्न, दहशतवाद, अणुयुद्धाच्या धमक्या, ही सर्व मृगजळे ठरतील. कारण भाऊ-भाऊच जर लढत असतील तर तिसऱ्याला मध्यस्थी करायला वावच उरत नाही. अर्थात, ही कबुली पचवणे पाकिस्तानच्या कट्टरपंथीयांना सोपे नाही. आसिफ यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यांना पदावरून हटवले जाऊ शकते. पण बाण सुटला आहे. आता तो मागे घेता येणार नाही. सोशल मीडियाच्या युगात ख्वाजा आसिफ यांचे हे विधान घराघरात पोहोचले आहे.

आजचा पाकिस्तानी तरुण विचारू लागला आहे की आमचे खरे शत्रू कोण? भारत, की ज्यांनी आम्हाला ७९ वर्षे खोट्या इतिहासात अडकवून ठेवले ते? ख्वाजा आसिफ यांनी अणुबॉम्बपेक्षा मोठा स्फोट घडवला आहे. तो स्फोट विचारांचा आहे, सत्याचा आहे. त्यांनी पाकिस्तानच्या निर्मितीचा पायाच उखडून टाकला आहे. आता पाकिस्तानपुढे दोनच पर्याय आहेत. एक तर सत्य स्वीकारून भारतासोबत हजारो वर्षांचे सांस्कृतिक नाते पुन्हा प्रस्थापित करायचे, किंवा या सत्याला नाकारून गृहयुद्धात आणि विघटनात संपून जायचे. पाकिस्तानने जर आपले हिंदू मूळ मान्य केले, तर तो कट्टरतेच्या दलदलीतून बाहेर पडून दक्षिण आशियात शांतता प्रस्थापित करू शकतो. ख्वाजा आसिफ यांचे विधान एक ऐतिहासिक वळण आहे. ते ऐकून पाकिस्तानी जनता सुन्न झाली आहे, भारतीय उपखंड अंतर्मुख झाला आहे. कारण कधी कधी एक वाक्य अणुबॉम्बपेक्षा जास्त शक्तिशाली ठरते. आसिफ यांनी तेच करून दाखवले आहे.

राष्ट्रहित जाणा!

पुण्यातील पिंपरी-चिंचवड शहरातील श्री मोरया गोसावी मंदिर परिसरात भरलेल्या यात्रेत 'मेड इन पाकिस्तान' (पाकिस्तानमध्ये उत्पादित केलेली वस्तू), असे 'लेबल' लावलेल्या वस्तूंची विक्री केली जात असल्याची घटना उघड झाली आहे. एका महिलेने याविषयीचा व्हिडिओ सामाजिक माध्यमांवर प्रसारित केला आहे. यात्रेतील कक्षावर खरेदी केलेल्या वस्तूंमध्ये एक चादर होती. तिच्यावर 'मेड इन पाकिस्तान' असे लेबल होते. ते पाहून त्या महिलेचा संताप अनावर झाला. या प्रकरणी अधिक चौकशी होईलच; पण या घटनेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, याची गंभीरतेने नोंद घ्यायला हवी. पाकिस्तान हे भारताचे शत्रूराष्ट्र! विविध आतंकवादी आक्रमणांमुळे, तसेच भारतीय सैनिकांना ठार केल्यामुळे भारतियांच्या मनात पाकविषयी रोष आहेच. त्यामुळे असे लेबल पाहून भारतियांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. हिंदू संघटित होऊन या घटनेचा सोक्षमोक्ष लावतीलच; पण सर्व यंत्रणा हाताशी असलेल्या पोलिसांनी तत्परतेने पावले उचलून संबंधितांवर कारवाई केल्यास हिंदूंना त्यांचा वेळ धार्मिक गोष्टींसाठी देता येईल. जर ग्राहकांनी अशा वस्तू खरेदी करतांना ऑनलाईन माध्यमांतून व्यवहार केला असेल, तर त्याद्वारे शोध घेऊन या टोळीच्या मुळाशी जाणे अधिक सोपे होऊ शकते. संबंधित महिलेने व्हिडिओद्वारे याचे वास्तव समोर आणले आहे; पण 'मेड इन पाकिस्तान' असे लिहिलेल्या अन्य चादरी किंवा वस्तू आणखी कुणाकडे गेल्या असतील, तर त्याचाही शोध घ्यावा लागेल. ज्या ग्राहकांनी असे लेबल असलेल्या वस्तू घेतल्या असतील, त्यांनीही पुढे येऊन वास्तव समाजाला सांगायला हवे. हिंदूंनी मोठ्या प्रमाणात याविरोधात आवाज उठवायला हवा. काही जणांचे म्हणणे आहे की, हे लेबल खोटेही असू शकते; पण 'जर लेबल खोटे आहे', असे मानले, तर मग असा खोडसाळपणा करणाऱ्यांवरही कारवाई का होऊ नये? एखाद्या भारतियाने 'मेड इन पाकिस्तान'चे लेबल लावणे, हा भारतियत्वाचा अवमानच आहे. अशा पाकप्रेमींची चौकशी करून त्यांना पाकिस्तानमध्ये हाकलून द्यायला हवे.

बाजारपेठांमध्ये किंवा यात्रेत विकल्या जाणाऱ्या अशा वस्तू नेमक्या येतात कुठून? स्थानिक विक्रेते त्यांची पडताळणी करतात का? शत्रूराष्ट्र असणाऱ्या पाकिस्तानच्या वस्तूंवर भारतात निर्बंध असतांना या वस्तू येथे येतातच कशा? असे प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण झाले आहेत. या अनुषंगाने पिंपरी-चिंचवडमधील व्यापाऱ्यांची चौकशी व्हायला हवी. या व्यापाऱ्यांमध्ये अधिक प्रमाणात मुसलमानांचा समावेश आहे. हे व्यापारी स्थानिक नसून मुंबई, कळवा, तसेच मुंब्रा या भागांतील असल्याचे उघड झाले आहे आणि हिंदु व्यापाऱ्यांची संख्या मात्र हाताच्या बोटांवर मोजता येईल इतकीच आहे.


मुसलमान व्यापारी त्यांचे बस्तान मांडतात आणि जागा अडवतात. काही हिंदुत्वनिष्ठांनी त्या व्यापाऱ्यांकडे ओळखपत्राची मागणी केली असता त्यांनी ते दाखवण्यास टाळाटाळ केली. त्यातील काही जणांकडे खोटी ओळखपत्रे होती, तर काही जण ओळखपत्रांअभावी कारवाईच्या भीतीने तेथून पळून गेले. याविरोधात आजवर अनेकदा हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी निवेदने देऊन विरोध केला, तसेच कारवाईची मागणीही केली; पण पिंपरी-चिंचवड महापालिका, पोलीस आयुक्तालय, महापौर-उपमहापौर, आजी-माजी नगरसेवक यांनी याविरोधात कोणतीही कारवाई केलेली नाही.

दायित्व एकमेकांवर ढकलून निष्क्रीय रहाण्याचे धोरण त्या सर्वांनी अवलंबले. अशाने होते काय, तर धर्मांधांचे फावते आणि अन्याय मात्र सहन करावा लागतो, तो हिंदूंना! या मुसलमान व्यापाऱ्यांवर नियंत्रण ठेवणार कोण? हा प्रश्नच आहे. पुण्यातील मोठमोठ्या मॉल्समध्ये 'मेड इन बांगलादेश', 'मेड इन ढाकाण असे लेबल लिहिलेल्या वस्तू विक्रीला ठेवलेल्या असतात. पाकिस्तानप्रमाणे बांगलादेशाच्या वस्तूंवरही निर्बंध आहेत का? हे पडताळायला हवे. जर निर्बंध असतील, तर मग या वस्तू मॉलमध्ये येतातच कशा? याचीही चौकशी व्हायला हवी. पुण्याप्रमाणे अन्य जिल्ह्यांत किंवा राज्यांत असे घडते का? याकडेही हिंदूंनी लक्ष देऊन प्रशासन किंवा सरकार यांच्याकडे याविषयी मोठ्या संख्येने तक्रारी प्रविष्ट करायला हव्यात. आता कोणतीही वस्तू किंवा उत्पादन खरेदी करतांना त्यांचा मूळ देश पडताळून घेणे क्रमप्राप्त आहे. आधी चीनने विविध वस्तूंच्या माध्यमातून भारतात हात-पाय पसरले आहेतच, त्यात आता पाकिस्तानची भर पडली! 'दुधाने तोंड पोळल्याने ताकही फुंकून प्यावे', असे म्हणतात; पण अशा घटना पहाता आता पाणीही फुंकून पिण्याची वेळ हिंदूंवर आली आहे. आज हिंदू पैसे, नोकरी, चंगळवाद यांच्या आहारी गेले आहेत. त्यामुळे धर्म किंवा राष्ट्र यांच्याशी त्यांना कसलेच देणे-घेणे नाही; पण याउलट मुसलमान 'धर्म आणि राष्ट्र प्रथम' मानतात अन् त्यातूनच इस्लामीत्व इतरांवर लादतात. पुण्यातील सारसबागेतील मंदिर परिसरात करण्यात आलेले नमाजपठण असो किंवा स्थानिक हिंदूबहुल परिसरात मुसलमान महिला-पुरुष यांचा वाढता वावर असो, ही पुणे जिल्ह्यासाठी धोक्याची घंटाच आहे. उद्या हेच धर्मांध आक्रमक झाले, तर पुण्यातील हिंदूंवर पलायनाची वेळ ओढावू शकते. हिंदूंनी याची भयावहता लक्षात घेऊन धर्मरक्षणासाठी वेळीच संघटित व्हायला

पनीर माखनी

साहित्य : जिरं १ टिस्पून, तमालपत्र १,२ , टोमॅटो प्युरे १ मध्यम कॅन, ८,१० काजू पाण्यात भिजवून मग पेस्ट करून, लाल तिखट-चवीप्रमाणे, हळद १ टीस्पून, कसूरी मेथी १,२ टेबलस्पून, फ्रेश /हेवी क्रिम साधारण १ कप, पनीर साधारण पाव किलो किंवा १५,२० तुकडे,(जशी ग्रेवी हवी असेल त्याप्रमाणे प्रमाण कमी जास्त करावं), मीठ चवीप्रमाणे

पाककृती : एका पातेलीत तेल गरम करुन त्यात जिरं, तमालपत्र घालून फोडणी करावी. त्यावर टोमॅटो प्युरे घालून झाकण घालून थोडा वेळ उकळी काढावी. मग त्यात हळद, लाल तिखट घालून नीट मिक्स करून काजू पेस्ट घालून पुन्हा उकळी काढावी. नंतर त्यावर कसुरी मेथी हाताने चुरून आणि फ्रेश क्रिम घालून पुन्हा शिजू द्यावे. चवीप्रमाणे मीठ घालून सर्वात शेवटी पनीरचे तुकडे घालावेत व पुन्हा झाकण घालून शिजवावे.



अधिक 'टीप : लागणारे जिन्नस हे अंदाजे आहेत. आपल्या आवडीप्रमाणे प्रमाण कमी जास्त करावं. तोच अमेरिकेत इंडियन ग्रोसरीमध्ये किंवा अमेरिकन ग्रोसरीमध्ये हेवी क्रीम मिळतं ते वापरावं.

नितळ त्वचेकरिता दालचिनीचा वापर



आपल्या एस्प्रेसो कॉफीचा स्वाद वाढवणे किंवा पुलाव, राजमा, इत्यादी पदार्थांचा स्वाद वाढविणारा मसाल्याचा सुवासिक पदार्थ म्हणजे दालचिनी. पण केवळ अन्नपदार्थांचा स्वाद वाढविणे एवढाच दालचिनीचा गुणधर्म नसून, ही दालचिनी आपल्या त्वचेच्या निगेसाठीही अत्यंत गुणकारी आहे. दालचिनीचे औषधी गुणधर्म तर गेल्या कित्येक शतकांपासून मनुष्याला ज्ञात आहेत. दालचिनीचा उपयोग आपली त्वचा नितळ आणि सुंदर बनविण्यासाठीही केला जाऊ शकतो.



दालचिनीची पूड आणि मध

दालचिनीची पूड मधात मिसळून चेहऱ्याला लावल्यास मुरुमे पुटकुळ्या कमी होण्यास मदत होते. त्याचबरोबर त्वचा सतत कोरडी पडत असल्यास एक केळे कुस्करावे, व त्यामध्ये एक लहान चमचा दालचिनीची पूड मिसळावी. ह्या पेस्टमध्ये काही थेंब मधही घालावा. हा फेस मास्क चेहऱ्यावर दहा मिनिटे लावून ठेवावा आणि त्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवून टाकावा. या मास्कमुळे चेहऱ्याला आर्द्रता मिळून त्वचेचा कोरडेपणा दूर होतो.



दालचिनीची पूड आणि ऑलिव्ह ऑईल


कित्येकदा प्रदूषण, मानसिक तणाव इत्यादी कारणांमुळे चेहऱ्यावर सुरकुत्या पडून अकाली वृद्धत्व आल्याप्रमाणे चेहरा दिसू लागतो. या सुरकुत्या घालविण्यासाठी दोन मोठे चमचे ऑलिव्ह ऑईलमध्ये अर्धा लहान चमचा दालचिनीची पूड मिसळावी. ही पेस्ट चेहऱ्यावर साधारण आठ ते दहा मिनिटे लावून ठेवावी. या पेस्टमधील ऑलिव्ह ऑईल त्वचेमध्ये जिरून त्वचा आर्द्र होते आणि दालचिनीमुळे त्वचेवरील मुरुमे नष्ट होतात. दहा मिनिटे उलटून गेल्यानंतर स्वच्छ ओलसर टॉवेलने चेहरा पुसून काढावा.

दालचिनीची पूड आणि दही

त्वचेवरील मृत पेशी काढून टाकून त्वचा मुलायम, चमकदार बनवण्यासाठी दोन मोठे चमचे दालचिनीची थोडी जाडसर पूड घ्यावी. ही पूड फार भरड नेसेल याची काळजी घ्यावी. त्यामध्ये दोन मोठे चमचे मध घालावा आणि ताजे दही घालावे. या पेस्टच्या मदतीने चेहरा स्क्रब करावा. त्यामुळे त्वचेवरील सर्व मृत पेशी निघून जाऊन चेहरा नव्याने उजळेल. त्याचप्रमाणे त्वचेवरील काळे डाग घालवण्यासाठीही दालचिनीची पूड व मधाचा वापर करता येतो.

स्ट्रेच मार्क्स घालवायचे आहेत? मग इकडे लक्ष द्या

स्ट्रेच मार्क्स हे एक प्रकारचे वण असून, त्वचा ताणली जाऊन मग एकदम सैल पडल्याने ते उद्भवतात. स्ट्रेच मार्क्स शरीरावर जास्त करून कंबर, पोट, मांड्या, दंड, पाठ, इत्यादी भागांमध्ये उद्भवतात. स्त्रियांच्या बाबतीत विशेषतः बाळंतपणानंतर स्ट्रेच मार्क्स दिसून येतात. वजन कमी झाल्याने पण त्वचा सैल पडून त्यावर स्ट्रेच मार्क्स येऊ शकतात.



आजकाल बाजारामध्ये स्ट्रेच मार्क्स घालविण्यासाठी अनेक मलमे, तेले उपलब्ध आहेत. पण या रासायनिक क्रीम्स किंवा तेलांचा वापर करण्यापेक्षा घरच्याघरी काही सोप्या उपायांचा अवलंब करून स्ट्रेच मार्क्स घालविता येऊ शकतात.

■ ह्या सर्व उपायांमध्ये वापरले जाणारे सगळे पदार्थ संपूर्णपणे प्राकृतिक असल्याने त्यांच्यापासून त्वचेला कुठल्याही प्रकारचा अपाय होण्याची शक्यता अगदी कमी असते. थोडीशी साखर, ऑलिव्ह ऑइल, आणि एका लिंबाचा रस मिसळून स्क्रब तयार करावा. हा स्क्रब स्ट्रेच मार्क्स वर लाऊन दहा मिनिटांपर्यंत चोळावा. त्यानंतर कोमट पाण्याने पुसून घेऊन स्क्रब काढून टाकावा.

■ बटाट्याच्या रसामध्ये त्वचेवरील पेशींना पोषक अशी तत्व असतात. तसेच नवीन पेशी तयार होण्यासाठीही बटाट्याचा रस उपयुक्त आहे. एका बटाट्याच्या गोल चकत्या कापून घेऊन त्या चकत्या स्ट्रेच मार्क्स आलेल्या ठिकाणी चोळाव्या. त्या चकत्यांचा रस पाच ते दहा मिनिटे स्ट्रेच मार्क्स वर तसाच राहू देऊन नंतर कोमट पाण्याने पुसून घ्यावा.

■ स्ट्रेच मार्क्स घालविण्याकरिता एरंडेल अतिशय उपयुक्त आहे. एरंडेल स्ट्रेच मार्क्स वर लावून सावकाश गोलाकार मालिश करावी. साधारण पंधरा ते वीस मिनिटे मसाज केल्यानंतर स्ट्रेच मार्क्स वर एक पातळ सुती कपडा ठेवावा आणि हिटिंग पॅड च्या मदतीने शेक घ्यावा. हा उपाय जितके वेळा करता येणे शक्य असेल तितक्या वेळेला करावा. त्यामुळे साधारण महिन्याभरात स्ट्रेच मार्क्स नाहीसे होतना दिसू लागतात.

■ तसेच ॲलो व्हेरा किंवा कोरफड ही स्ट्रेच मार्क्स घालाविण्याकरिता उत्तम समजली जाते. पण बाजारातील तयार ॲलो व्हेरा जेल वापरण्यापेक्षा कोरफडीचा ताजा गर वापरणे जास्त चांगले. कोरफडीमधील गर काढून घेऊन स्ट्रेच मार्क्स वर लावावा. हा गर स्ट्रेच मार्क्स वर दोन ते तीन तास लावून ठेवावा आणि त्यानंतर कोमट पाण्याने पुसून टाकावा.

■ जर्दाळूंची पेस्ट बनवून ती स्ट्रेच मार्क्स ला लावल्याने ही स्ट्रेच मार्क्स नाहीसे होण्यास मदत मिळते. दोन ते तीन जर्दाळूंच्या बिया काढून टाकून ते जर्दाळू बारीक वाटून घेऊन त्याची पेस्ट तयार करावी. हे पेस्ट स्ट्रेच मार्क्सवर लावून वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर कोमट पाण्याने पुसून टाकावी. या घरगुती उपायांचा अवलंब केल्याने स्ट्रेच मार्क्स निघून जाऊन त्वचा नितळ आणि चमकदार बनेल.

किती लोकांनी पाहिलं तुमचं इंस्टाग्राम प्रोफाइल? असं करा चेक

तुमचं इंस्टाग्राम प्रोफाइल किती लोकांनी पाहिलं हे जाणून घेण्याचे काही मार्ग आहेत. त्यांची माहिती आपण आज घेणार आहोत. तसेच अनावश्यक लोकांपासून दूर राहण्याचा उपाय देखील सांगणार आहोत.

सध्या इंस्टाग्राम हे सर्वाधिक वापरलं जाणारं सोशल मीडिया ॲप बनलं आहे. बऱ्याचदा लोक लाइक्स आणि फॉलोवर्स मिळवण्यासाठी फोटो आणि व्हिडीओ शेअर करतात. परंतु काही वेळा लोक आपल्या प्रोफाइलवर हवे तेव्हा येतात आणि फॉलो न करता जातात. तुम्हाला जर अशा लोकांना रंगेहात पकडायचं असेल तर तुम्ही काही ट्रिक्स वापरू शकता. चला जाणून घेऊया कशाप्रकारे तुम्ही तुमच्या इंस्टाग्राम प्रोफाइलवर पाळत ठेवणाऱ्या युजर्सना शोधू शकता.



इंस्टाग्राम प्रोफाइल कोणी पाहिलं हे कसं बघायचं

वर सांगितल्याप्रमाणे अनेक मागार्नी इंस्टग्राम प्रोफाइल कोणी पाहिलं हे बघता येतं. लक्षात असू द्या हे मार्ग पूर्ण माहिती देत नाहीत. ह्यात स्टोरी व्युज, हायलाइट व्युज आणि थर्ड पार्टी ॲप्सचा समावेश आहे.

इंस्टाग्राम स्टोरी कोणी पहिली हे कसं बघायचं

■ स्टोरी पोस्ट केल्यावर तुमच्या प्रोफाइल आयकॉनवर होम किंवा प्रोफाइल टॅबमधून टॅप करा.

■ प्रोफाइल पिक्चरवर टॅप करून स्टोरीज ओपन करा.

■ त्यानंतर स्वाइप अप करून कोणी स्टोरीज पाहिल्या हे चेक करा.

नोट: स्टोरी अपलोड केल्यावर २४ तासांमधील व्युज इथे दिसतील.

असं पाहा इंस्टाग्राम स्टोरीज हायलाइट्स कोणी पहिल्या

■ खालच्या बाजूला उजवीकडे असलेल्या प्रोफाइल आयकॉनवर टॅप करा.

■ प्रोफाइल सेक्शनमध्ये स्टोरीज हायलाइट्सवर टॅप करा.

■ कोणत्याही हायलाइटमधील स्टोरी ओपन करा.

■ त्यानंतर स्टोरी हायलाइट स्वाइप अप करा.

■ तुम्हाला तुमच्या स्टोरीज आणि हायलाइट कोणी पहिल्या ते दिसेल.

नोट : इथे फक्त ४८ तासांचे व्युज दिसतात.

प्रोफाइल व्युज बघण्यासाठी बिजनेस प्रोफाइलचा वापर

इंस्टाग्राम बिजनेस प्रोफाइल युजर्सना इंटरॅक्शन आणि रिचची माहिती देतं. त्यामुळे युजर्सना त्यांच्या प्रोफाइलला भेट देणाऱ्यांची संख्या कळते. तसेच त्यांच्या फोटोवरील व्युज आणि रिचची डेमोग्राफिक माहिती मिळते. इंस्टाग्रामवरील बिजिनेस प्रोफाइल व्हिजिटर्सवर लक्ष ठेवण्यासाठी चांगलं माध्यम आहे. लक्षात असू द्या बिजिनेस प्रोफाइल इनसाइट्सच्या मदतीनं तुम्ही फक्त व्हिजिटर्सची संख्या जाणू शकता, नावे नाही.

इंस्टाग्रामवर बिजिनेस प्रोफाइल कसं बनवायचं

• उजवीकडे खालच्या बाजूल असलेल्या तुमच्या प्रोफाइल आयकॉनवर टॅप करा.

• वरच्या बाजूला उजव्या कोपऱ्यात असलेल्या मेन्यू आयकॉनवर टॅप करून सेटिंग आणि प्रायव्हसी मेनूमध्ये जा. • खाली स्क्रोल करा आणि "Account Type and Tools" वर क्लिक करा.

• अकाऊंट टाइप आणि टूल मध्ये 'Switch to Professional Account' वर क्लिक करा.

• कंटिन्यूवर टॅप करून प्रोसेस पूर्ण करा.

• बिजनेस प्रोफाइलचे इनसाइट्स कसे बघायचे

• बिजिनेस अकाऊंट म्हणून व्हेरिफिकेशन केल्यावर

• तुमच्या प्रोफाइलवर जा

• बायोच्या खाली असलेल्या इनसाइट्स ऑप्शनवर टॅप करा.

अनोळखी लोकांना इंस्टाग्राम प्रोफाइलपासून कसं दूर ठेवायचं?

अनोळखी लोकांना आपल्या प्रोफाइलपासून दूर ठेवणं सोपं आहे. तुम्ही तुमचं अकाऊंट प्रायव्हेट करू शकता. अकाऊंट प्रायव्हेट केल्यावर तुम्ही तुम्हाला कोण फॉलो करू शकतं आणि कोण प्रोफाइल पाहू शकतं हे ठरवू शकता.

इंस्टाग्राम अकाऊन्ट प्रायव्हेट करण्याची पद्धत

■ तुमच्या प्रोफाइलमध्ये जा ■ सेटिंग्स मेनूवर टॅप करा ■ खाली स्क्रोल करून अकाऊंट प्रायव्हसीवर टॅप करा ■ प्रायव्हेट अकाऊंटसमोरील टॉगल ऑन करा. तुमचं अकाऊंट प्रायव्हेट केल्यावर तुम्ही तुम्हाला कोण फॉलो करणार हे ठरवू शकता. तसेच ह्याच स्टेप्स फॉलो करून तुम्ही अकाऊंट पुन्हा पब्लिक करू शकता.

साध्या पद्धतीने चेहरा स्वच्छ ठेवण्याच्या काही टिप्स

घरच्या घरी सहज साध्या पद्धतीने चेहरा स्वच्छ ठेवण्याच्या काही टिप्स आहेत, त्यामुळे दिवसाच्या थकव्यानंतर त्वचेला स्वच्छ करणे तसेच पुनरुज्जीवित करणे आवश्यक असते. त्यासाठी घरच्या घरी सहज साध्या पद्धतीने चेहरा स्वच्छ ठेवण्याच्या काही टिप्स

ही काळजी घ्या आणि सतेज कांती मिळवा

■ चेहरा धुण्यासाठी तुमच्या त्वचेनुसार योग्य ते फेस वॉश अथवा क्लिंजिग वापरा.

■ चेहऱ्यावरील छिद्र बुजवण्यासाठी क्लिंजिंग मिल्कच्या सहाय्याने चेहरा साफ करा.

■ चेहऱ्याच्या त्वचेला सोसवेल इतकी गरम वाफ घ्या.

■ चेहरा थंड करण्यासाठी बर्फाने मसाज करा.

■ त्यानंतर फेस स्क्रबरने ८-१० मिनिटे चेहरा साफ करा.

■ चेहरा सुकल्यानंतर चेहऱ्याला मध लावा जेणेकरून त्वचा उजळ होण्यास मदत होईल

■ चेहरा स्वच्छ धुवून आवडीनुसार फेस पॅक लावा.

■ हळूहळू चेहरा सुकू द्या.



चेहऱ्यावरील केस हटवण्याकरिता अवलंबा हे उपाय

चेहऱ्यावरील नकोसे असणारे केस कसे हटवावे हा तरुण मुली किंवा महिलांच्या समोरील मोठा प्रश्नच असतो. हे केस हटवण्याकरिता अनेक उपाय उपलब्ध आहेत. त्यापैकी वॅक्सिंग, थ्रेडिंग, लेसरद्वारे केस काढून टाकणे असे अनेक उपाय साधारणपणे अवलंबले जातात. पण या उपायांच्या व्यतिरिक्त घरच्या घरी काही उपाय करून चेहऱ्यावरील केस हटवता येऊ शकतात. या उपायांच्या अवलंबाने चेहऱ्यावरील केसांची वाढ हलकी होऊन कालांतराने संपूर्णपणे बंद होते.



चेहऱ्यावरील केस काढून टाकण्याकरिता एक उत्तम फेस पॅक घरच्या घरी तयार करता येतो. एका भांड्यामध्ये अर्धा कप बेसन, एक लहान चमचा हळद, एक लहान चमचा दुधावरची साय आणि अर्धा कप दूध हे सर्व एकत्र करून त्याची दाट पेस्ट बनवावी. ही पेस्ट चेहऱ्यावर व्यवस्थित लावून घ्यावी. सुमारे अर्धा तास ही पेस्ट चेहऱ्यावर तशीच राहू द्यावी. त्यानंतर ज्या दिशेने केसांची वाढ असेल, त्याच्या विरुद्ध दिशेने चेहरा हळुवार गोलाकार चोळण्यास सुरुवात करावी. हा फेस पॅक चेहऱ्यावरून पूर्णपणे काढून टाकल्यानंतर कोमट पाण्याने चेहरा स्वच्छ धुवून टाकावा. आठवड्यातून दोन वेळेला या फेस पॅकचा वापर करावा. एका बाऊलमध्ये एक मोठा चमचा पपईचा गर, अर्धा लहान चमचा हळद आणि चार मोठे चमचे ॲलो व्हेरा जेल वापरून पेस्ट तयार करावी. आपल्या चेहऱ्यावर नकोशा केसांची वाढ जिथे आहे, त्या भागावर ही पेस्ट लावून, सुमारे वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर केसांच्या वाढीच्या विरुद्ध दिशेने चोळत पेस्ट चेहऱ्यावरून उतरवून टाकावी व नंतर कोमट पाण्याने चेहरा धुवून टाकावा. एका मोठ्या लिंबाच्या रसामध्ये एक मोठा चमचा मध मिसळावा. हे मिश्रण वीस ते पंचवीस मिनिटे चेहऱ्याला लावून ठेवावे. या फेस मास्कमुळे चेहऱ्यावरील केसांची वाढ हलकी होत जाते आणि कालांतराने संपूर्णपणे थांबून जाते.



कापूर : छोट्या-मोठ्या आजारात प्रभावी औषध

कापूर हा विशिष्ट झाडांपासून बनवला जाणारा सुगंधी पदार्थ घरात, मंदिरात पूजा करताना आवर्जून वापरला जातो. देवाची कापूर आरती करण्याची प्रथा भारतात सर्वत्र आहे. हा कापूर आयुर्वेदात एक घरगुती औषधी म्हणून महत्त्वाचा मानला गेला असून त्याचे अनेक उपयोग आहेत. इतकेच नव्हे तर त्वचा, केस, स्नायू यांचे अनेक विकार त्याने दूर करता येतात. कापूर आणि त्याचे तेल यांचा वापर अनेक औषधे बनवताना केला जातो. त्यापासून अनेक मलमे बनवली जातात. पोटदुखी असेल तर एक ग्लास पाण्यात १ चमचा ओवा घालून ते पाणी उकळवून अर्धे झाले की त्यात थोडा कापूर घालून प्यायल्याने दुखण्याला उतार पडतो. सांधेदुखीत कापूर तेलाचे मालिश केल्यास बरे वाटते. तसेच खाज, इन्फेक्शन यावर खोबरेल तेलात कापूर घालून चोळण्याने आराम पडतो. भाजले असेल तर त्या ठिकाणी कापूर तेल लावल्यास जळजळ थांबते आणि संसर्ग होत नाही. इतकेच नव्हे तर घरात कापूर जाळला तरी घरातील जंतू नष्ट होतात. तोंडावर मुरमे, पुटकुळ्या येत असतील तर खोबरेल तेल आणि कापूर यांचे मिश्रण त्वचेवर चोळल्यास डाग राहत नाहीत. कोमट पाण्यात कापूर आणि थोडे मीठ घालून पाय बुडवून बसले तर टाचेच्या भेगा कमी होतात. ओलिव्ह तेलात कापूर घालून त्याने डोक्याला मसाज केल्यास स्ट्रेस, डोकेदुखी थांबते. दातदुखी असेल तर कापूर पावडर दातात धरली तर दात दुखायचा थांबतो. सर्दी खोकला झाल्यास खोबरेल तेल आणि कापूर यांचे मिश्रण छाती, डोक्यावर चोळावे. आराम पडतो. जुलाब होत असतील तर ओवा, कापूर आणि पेपरमिंट समप्रमाणात घेऊन काचेच्या बरणीत उन्हात ठेवावे. ६-८ तासांनंतर मिश्रणाचे ४-५ थेंब टाकून सरबत घ्यावे. रात्री झोपण्यापूर्वी कच्चे दुध आणि कापूर पावडर कापसाने चेहऱ्यावर लावावी आणि १५ मिनिटाने धुवावे. त्वचा चमकदार आणि हेल्दी होते. कापले किंवा कोणत्याची कारणाने जखम झाली तर कापूरमिश्रित पाणी लावावे. तोंड आल्यास शुद्ध तुपात कापूर घालून सेवन केल्यास उतार पडतो. पर्यटन अथवा ट्रेकिंगसाठी अधिक उंचीच्या ठिकाणी गेल्यास अनेकदा श्वास घ्यायला त्रास होतो, चक्कर येते अशावेळी कापूर नाकाला लावून रुमाल हुंगला तरी आराम पडतो.



डोके दुखतेय? हे करून पहा

आपल्या शरीराचा महत्त्वाचा भाग म्हणजे डोके. डोक्याच्या कवटीत आपला मेंदू असतो व हा मेंदूच साऱ्या शरीराचे नियंत्रण करत असतो. डोकेदुखीचा त्रास झाला नाही असा माणूस शोधूनही सापडणे अवघड. डोके दुखायला लागले की काही सुचेनासे होते. अशा वेळी चटकन एखादी वेदनाशामक गोळी घेण्याकडे आपला सहजच कल असतो. पण डोके नक्की कोणत्या कारणाने दुखते हे कळले तर त्यावर अगदी सहज सोपे उपाय करूनही ही डोकेदुखी थांबवता येते. त्यासाठी ही माहिती जरूर वाचा.

■ डोके दुखत असेल तर अमसुले पाण्यात भिजत घालून, कुस्करून साखर मीठ घातलेले सरबत अथवा कोकम सरबत घ्यावे.

■ बरेच वेळा रात्री काही कारणाने झोपायला उशीर होतो व जागरण होते. जागरणाने डोके दुखत असेल तर १५ मिनिटे झोप अथवा विश्रांती हा चांगला उपाय आहे. डोक्यातील कलकलही या विश्रांतीमुळे कमी होते.

■ वेळी-अवेळी खाणे. सततचे उपवास अथवा बराच काळ उपाशी राहणे याने पित्त वाढते व बरेच वेळा त्यामुळे डोकेदुखी होते. पित्ताने डोके दुखत असल्यास गार दूध प्यावे.

■ अर्धशिशीचा त्रास होत असेल तर - सुंठ अधिक जायफळ यांचा लेप भुवईच्या वर लावावा. शिंक काढण्याच्या कोणत्याही उपायाने शिंक काढल्यासही अर्धशिशी कमी होते अथवा सकाळी उठल्याबरोबर पेढा खाल्ल्याने ती कमी होते. अर्धशिशी पित्त व सर्दीमुळे होते. पेढ्याने पित्त कमी होते व शिंक काढण्याने सर्दी मोकळी होते. अर्धशिशी म्हणजे डोक्याचा अर्धा भाग दुखणे. हे दुखणे त्रासदायक असते व सूर्योदयापासून ते सुरू होते ते सूर्यास्तानंतर कमी होते.

■ सर्दी अथवा बारीक ताप किंवा अंग मोडून येणे यासारख्या आजारातही डोके दुखते. गरम पाण्याच्या पिशवीने डोके शेकून काढल्यास ही डोकेदुखी थांबते. अथवा अमृतांजन किंवा तत्सम बाम डोक्यास चोळल्यासही आराम पडतो.

■ बरेच वेळा जादा वाचन, टीव्ही पाहणे अथवा डोळ्यावर ताण आणणारी कामे झाल्यासही डोके दुखते. अशा वेळी डोळ्यांना चष्मा आला नाही ना, याची खात्री करून घ्यावी. डोळ्याला नंबर आल्यानेही डोकेदुखी होते व योग्य नंबरचा चष्मा वापरायला सुरुवात केली की ती बंद होते.



वजन घटवण्यास सहाय्यक 'सुपर फूड्स'

वजन घटवण्याच्या एकंदर कवायतीत 'सुपर फूड्स' वापरणे उपयुक्त ठरू लागलेले आहे. सुपर फूड्स अशा अन्नपदार्थांना म्हटले गेले आहे, ज्यांच्या सेवनाने वजन घटवण्यास मदत तर मिळतेच, शिवाय आपल्या शरीराला आवश्यक असे सर्व प्रकारचे पोषणही मिळते.

बदाम : बदाम हा अन्नपदार्थ आपल्या शरीरास अनेक प्रकारे उपयुक्त आहे. बदामाच्या सेवनाने बुद्धिमत्ता तीक्ष्ण होते हे ज्ञान फार पूर्वीपासूनचे आहे. तसेच बदामाच्या सेवनाने वजन घटवण्यासही मदत मिळते. बदामामध्ये असलेले एल अर्जेनाईन हे अमिनो ॲसिड व्यायामाच्या वेळी शरीरातील फॅट्स वेगाने वापरले जाण्यास मदत करते. याचमुळे बदामाला नैसर्गिक 'वेट लॉस पिल' असेही म्हटले गेले आहे. या सुपर फूडचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी बदाम आपल्या दैनंदिन आहारात जरूर समाविष्ट करावा. रोज रात्री बदाम पाण्यामध्ये भिजत घालून दुसऱ्या दिवशी सकाळी खावेत. साधारण पाच ते सात बदामांचे सेवन आपल्या दररोजच्या आहारामध्ये असावे.



ओटमील : वजन एकदा कमी झाले की ते तसेच टिकवून ठेवणे हेही मोठेच काम असते. त्या कामी ओटमील आपली मदत करू शकते. ओटमीलमध्ये बीटा ग्लुकोन नावाचे फायबर असते, ज्यामुळे ओटमील खाल्ल्यानंतर पुष्कळ वेळपर्यंत पोट भरलेले राहून लवकर भूक लागत नाही. तसेच ओटमीलमध्ये कॅलरीजची मात्रा अतिशय कमी असून अन्य 'रेडी टू ईट' नाश्त्यांच्या पदार्थांच्या मानाने फायबरही मुबलक प्रमाणात असते. साधारण दीड कप ओटमीलमध्ये १५० कॅलरीज असतात.

संत्रे : वजन घटवण्यास सहाय्यक अशा सुपर फूड्समध्ये अगदी सहज उपलब्ध असते ते म्हणजे संत्रे. अँटी ऑक्सिडंट्स भरपूर मात्रेमध्ये असणारे हे फळ शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करण्यास उपयुक्त आहे. संत्र्याच्या नियमित सेवनाने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते व त्वचाही नितळ, सुंदर दिसू लागते. एका पूर्ण संत्र्यामध्ये केवळ ५९ कॅलरीज असतात. संत्र्यामध्ये फायबरही मुबलक असून त्याच्या सेवनाने भूक लवकर शमते.



कडधान्ये : मसूर, राजमा यांसारखी कडधान्ये फायबर आणि प्रथिनांनी परिपूर्ण असतात. यामध्ये स्टार्च ही असतो. कडधान्यांच्या सेवनाने वजन घटवत असताना देखील शरीरातील ताकद चांगली टिकून राहते व अशक्तपणा जाणवत नाही. कडधान्यांप्रमाणेच जवस ही वजन घटवण्यासाठी अतिशय उपयुक्त आहेत. यामध्येही फायबरचे प्रमाण खूप जास्त आहे. तसेच जवसामध्ये ओमेगा ३ फॅटी ॲसिड्सही आहेत. आजवर केल्या गेलेल्या अनेक शास्त्रीय अभ्यासांमध्ये हे निदान केले गेले आहे की ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स वजन घटवण्यास सहाय्यक असून हृदयाच्या आरोग्याकरिताही अतिशय गुणकारी आहेत. जवस भाजून त्याची पूड करून घेऊन ही पूड आपले ज्यूस, स्मूदी, दही व ताकामध्ये मिसळून सेवन करावी.

मान्सूनची महाराष्ट्रात जोरदार एन्ट्री

पुढील 24 तासांत वादळी पाऊस, 17 राज्यांना अलर्ट



■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

देशभरारतील नागरिक आणि शेतकरी ज्या पावसाची आतुरतेने वाट पाहत होते त्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी आता वेग पकडला आहे. केरळमध्ये प्रवेश केल्यानंतर मान्सून आता महाराष्ट्राच्या तळकोकणापर्यंत पोहोचला आहे. यामुळे अनेक भागांमध्ये वातावरणात मोठा बदल दिसून येत आहे. एकीकडे उन्हाच्या तीव्र झळांपासून दिलासा मिळत असताना दुसरीकडे हवामान विभागाने पुढील 24 तासांसाठी अलर्ट जारी केले आहे. देशातील तब्बल 17 राज्यांमध्ये जोरदार पाऊस, वीजांचा कडकडाट आणि वेगवान वाऱ्यांची शक्यता वर्तवण्यात आली आहे. काही भागांमध्ये वाऱ्यांचा वेग ताशी 80 ते 90 किलोमीटरपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आगामी काही दिवसात मान्सून आणखी वेगाने पुढे सरकण्याची चिन्हे दिसत असून अनेक राज्यांमध्ये पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

17 राज्यांना सतर्कतेचा इशारा

महाराष्ट्रात सध्या विविध भागांमध्ये ढगाळ वतावरणासह अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत आहेत. कोकण पट्ट्यात मान्सून दाखल झाल्याने वातावरण अधिक अनुकूल बनले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार महाराष्ट्रासह केरळ, गोवा, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, झारखंड, ओडिशा, सिक्कीम, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, तामिळनाडू, मणिपूर, त्रिपुरा, पुदुचेरी, अंदमान-निकोबार बेटे आणि लडाख या भागांमध्ये हवामानाचा प्रभाव अधिक जाणवू शकतो. या राज्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम तर काही भागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता असून वादळी वाऱ्यांमुळे झाडे उन्मळून पडणे, वीजपुरवठा खंडित होणे किंवा स्थानिक पातळीवर वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पावसासोबतच वाऱ्यांचा वेगही चिंतेचा विषय ठरत आहे. काही भागांमध्ये ताशी 80 ते 90 किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. त्यामुळे समुद्रकिनारी भाग, मोकळी मैदाने तसेच उंच झाडांच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचासल्ला देण्यात आला आहे.

मुंबईकडे मान्सूनची वाटचाल

मान्सूनची प्रगती पाहता मुंबईतही लवकरच त्याचे आगमन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरात ढगाळ वातावरण आणि अधूनमधून सरींचा अनुभव येत आहे. हवामानातील बदल पाहता पुढील एक-दोन दिवसांत मान्सून मुंबईत दाखल होऊ शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्याचबरोबर राज्यातील शेतकरी वर्ग गेल्या अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत होता. खरीप हंगामाची तयारी सुरू असताना मान्सूनच्या आगमनामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. पावसाची सातत्यपूर्ण सुरुवात झाल्यास पेरणीच्या कामांना वेग मिळू शकतो. त्यामुळे ग्रामीण भागात समाधानाचे वातावरण निर्माण होत आहे.

यंदा मान्सूनचे आगमन काहीसे उशिराने झाले असले तरी त्याची पुढील वाटचाल समाधानकारक आणि वेगवान असल्याचे चित्र दिसत आहे. पुढील काही दिवस देशातील अनेक भागांसाठी महत्त्वाचे ठरणार असून पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सावध राहून हवामानातील बदलांवर लक्ष ठेवणे आवश्यक ठरणार आहे.

मान्सूनच्या विलंबामुळे मुंबईत पाणी चिंता वाढली...

पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावांतील साठा १३.५५ टक्क्यांवर

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावांतील पाणीसाठा आता धोक्याच्या पातळीवर पोहोचला आहे. उशिरा येणाऱ्या मान्सूनमुळे तलावांतील एकूण उपयुक्त पाणीसाठा १,९६,१४१ दशलक्ष लिटर इतकाच शिल्लक राहिला असून तो एकूण क्षमतेच्या केवळ १३.५५ टक्के आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ६ जूनच्या आकडेवारीनुसार, तलावांची एकूण पूर्ण साठवण क्षमता १४,४७,३६३ टछ इतकी आहे. विशेष म्हणजे, अपर वैतरणा तलावातील उपयुक्त पाणीसाठा पूर्णपणे संपुष्टात आला आहे.

१० टक्के पाणी कपात सुरूच

मुंबईत १९ ऑगस्टपर्यंत पुरेसा पाणीपुरवठा राखण्यासाठी इटउ ने १५ मेपासून १० टक्के पाणी कपात लागू केली आहे. मात्र, मान्सून अजून मुंबईत दाखल न झाल्याने चिंता अधिक वाढत आहे.

प्रादेशिक हवामान केंद्राने, मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज व्यक्त केला असला तरी शहरात अजूनही समाधानकारक पाऊस झालेला नाही. उलट, मुंबईत उकाडा आणि दमट हवामान कायम आहे.

दररोज ४,००० दशलक्ष लिटर पाण्याचा वापर



मुंबई शहराला मोडक सागर, तानसा, भातसा, तुळशी, विहार, अपर वैतरणा आणि मध्य वैतरणा या सात तलावांमधून दररोज सुमारे ४,००० टछ पाणीपुरवठा केला जातो.

सध्याचा पाणीसाठा किती?

महापालिकेच्या आकडेवारीनुसार, मध्य वैतरणा, तानसा, मोडक सागर आणि अपर वैतरणा या तलावांतील एकत्रित पाणीसाठा ९०,४७९ टछ इतका आहे. हा त्यांच्या एकूण उपयुक्त साठवण क्षमतेच्या १३.०३ टक्के आहे.

यामध्ये मोडक सागर तलावात सर्वाधिक ४३,२६० टछ म्हणजेच ३३.५५ टक्के पाणीसाठा नोंदवला गेला आहे. त्यानंतर मध्य वैतरणामध्ये ३४,५७३ टछ म्हणजे १७.८६ टक्के साठा आहे.

तानसा तलावात १२,६४६ टछ म्हणजे ८.७२ टक्के पाणी उपलब्ध आहे. तर अपर वैतरणा तलावातील उपयुक्त पाणीसाठा पूर्णपणे शून्यावर पोहोचला आहे.

विहार तलावात सर्वाधिक टक्केवारी

इतर तलावांमध्ये विहार तलावात सर्वाधिक ४४.२४ टक्के पाणीसाठा नोंदवला गेला असून तेथे १२,२५४ टछ पाणी उपलब्ध आहे.

तुळशी तलाव २५.७३ टक्के क्षमतेवर असून तेथे २,०७० टछ पाणी उपलब्ध आहे. तर भातसा तलावात ९१,३३७ टछ म्हणजे १२.७४ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.

अपर वैतरणातून पाणी सोडणे बंद

बीएमसीने दिलेल्या माहितीनुसार, मध्य वैतरणा तलावातून ३० नोव्हेंबर २०२५ पासून पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली होती. मात्र, अपर वैतरणा तलावातून २ जून २०२६ पासून पाणी सोडणे पूर्णपणे बंद करण्यात आले आहे.

तलाव परिसरात पावसाची प्रतीक्षा

सातही तलावांच्या परिसरात अजून समाधानकारक पावसाची नोंद झालेली नाही. मान्सून हंगाम सुरू झाल्यापासून तानसा तलाव परिसरात केवळ १३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मान्सून आणखी लांबल्यास मुंबईसमोरील पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नेस्को प्रकरणाची पुनरावृत्ती वरळीतील कॉन्सर्टमध्ये २८ वर्षीय तरुणाचा संशयास्पद मृत्यू

■मुंबई। प्रतिनिधी,

नेस्को प्रकरणाची पुनरावृत्ती वरळीतील कॉन्सर्टमध्ये २८ वर्षीय तरुणाचा संशयास्पद मृत्यू, पोलीस तपास सुरू'एआय'ने बनविलेली प्रातिनिधिक प्रतिमा

मुंबईतील वरळी येथील एनएससीआय डोममध्ये आयोजित लाइव्ह म्युझिक कॉन्सर्टदरम्यान २८ वर्षीय तरुणाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणाचा पोलिसांकडून तपास सुरू असून मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.



नेस्को प्रकरणानंतर पुन्हा चर्चा

काही महिन्यांपूर्वी गोरेगावमधील नेस्को सेंटर येथे झालेल्या टेक्नो कॉन्सर्टनंतर दोन एमबीए विद्यार्थ्यांचा संशयित अमली पदार्थांच्या ओव्हरडोसमुळे मृत्यू झाला होता. या प्रकरणानंतर पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर तपास मोहीम राबवून कथित ड्रग्ज पुरवठादार, विद्यार्थी, सुरक्षा रक्षक, नेस्कोशी संबंधित कर्मचारी आणि कार्यक्रम आयोजकांसह ९२ जणांना अटक केली होती. वरळीतील या नव्या घटनेमुळे पुन्हा एकदा मोठ्या संगीत कार्यक्रमांमधील सुरक्षा, मद्यसेवन आणि इतर संभाव्य धोक्यांबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

मृत तरुणाची ओळख वृषभ महेंद्र गांगुर्डे अशी झाली आहे. तो आपल्या एका मैत्रिणीसोबत कार्यक्रमाला गेला होता.

प्रकृती अचानक बिघडली

प्राथमिक माहितीनुसार, कार्यक्रमादरम्यान वृषभने मोठ्या प्रमाणात मद्यसेवन केल्याचा संशय आहे. त्यानंतर त्याची आणि त्याच्यासोबत असलेल्या तरुणीची प्रकृती बिघडली.

तरुणीची प्रकृती आता स्थिर आहे. मात्र वृषभची प्रकृती गंभीर झाल्याने त्याचा मृत्यू झाला.

पोलिस तपास सुरू

६ जून रोजी एनएससीआय डोममध्ये 'द आउटवर्ल्ड बाय क्लांगकुन्स्टलर' म्युझिक कॉन्सर्ट आयोजित करण्यात आला होता. मात्र मृत्यूची घटना याच कार्यक्रमादरम्यान घडली का, याबाबत पोलिसांकडून अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

सध्या पोलिस सीसीटीव्ही फुटेज, उपस्थितांची माहिती आणि इतर पुराव्यांची तपासणी करत आहेत. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

आई इकडे डान्समध्ये व्यस्त, तर तिकडे सावत्र बापाने दीड वर्षांच्या बाळाला केली मारहाण, अन् मग...

■मुंबई। प्रतिनिधी,

केरळमधील तिरुवनंतपुरम जिल्ह्यातील नेदुमंगड येथे एका दीड वर्षाच्या निष्पाप बालकाचा झालेल्या वेदनादायक मृत्यूने संपूर्ण राज्य हादरले आहे. सुरुवातीला निव्वळ अपघात वाटणारा हा प्रकार प्रत्यक्षात एक क्रूर हत्याकांड असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. अर्शीद असे या दुदैर्वी बालकाचे नाव असून, सावत्र वडिलांनी केलेल्या मारहाणीमुळे त्याचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या घटनेने मानवतेला काळिमा फासला असून बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



निर्दयी दांपत्याची क्रूरता

यानंतर समोर आलेल्या रिपोर्टने काळजाचा थरकाप उडवणाऱ्या हत्याकांड उघडकीस आले. वैद्यकीय अहवालानुसार, बालकाच्या नाजूक शरीरावर मारहाणीचे अनेक जुने व गंभीर व्रण आढळून आले आहेत. यापूर्वीही या लहानग्याचे काही वेदनादायी फोटो समोर आले होते, ज्यामध्ये त्याच्या दोन्ही लहान हातांना प्लास्टर बांधलेले दिसत होते. त्यावेळी अश्कर आणि अखिला या निर्दयी दाम्पत्याने आपली क्रूरता लपवण्यासाठी, मुलगा खेळताना पडल्यामुळे त्याला दुखापत झाल्याचा खोटा दावा केला होता.

...तेव्हा आई डान्समध्ये बिझी

घटनेच्या दिवशी चिमुरडा अर्शीद त्याचा सावत्र बाप अश्कर याच्यासोबत घरी होता. अश्कर याने पोलिस आणि रुग्णालयाची दिशाभूल करण्यासाठी एक खोटी कहाणी रचली होती. त्याने सांगितले की, तो मुलाला भात भरवत असताना मुलाने उलट्या केल्या आणि अन्न त्याच्या गळ्यात अडकले. अत्यंत गंभीर अवस्थेत तडफडणाऱ्या बालकाला तातडीने एसएटी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांचे सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले आणि उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. संतापजनक बाब म्हणजे, जेव्हा हा निष्पाप जीव मृत्यूशी झुंज देत होता, तेव्हा त्याची सख्खी आई अखिला त्याला घरात सोडून तामिळनाडूमध्ये एका 'डान्स प्रोग्राम'मध्ये सहभागी होण्यासाठी गेली होती.

आईलाही अटक होणार

या धक्कादायक प्रकारानंतर नातेवाईक आणि कुटुंबीयांनी संशय व्यक्त करत पोलिसांत तक्रार दाखल केली. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, सावत्र पिता अश्कर हा निष्पाप अर्शीदला वारंवार बेदम मारहाण करत असे आणि त्याला असह्य यातना देत असे. पोलिसांनी आता या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल केला असून बालकाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी तिरुवनंतपुरम मेडिकल कॉलेज रुग्णालयात पाठवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करत असून, लवकरच या क्रूर सावत्र पित्याला आणि निष्काळजी माता अखिला हिला अधिकृतपणे अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

12 वर्षांची मुलगी लघुशंकेसाठी उठली

दोघांनी मिळून बंदुकीचा धाक दाखवत जंगलात...

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

उत्तर प्रदेशातील संभळच्या आसमोली पोलीस ठाणे परिसरात शौचास गेलेल्या 12 वर्षीय मुलीचे दोन तरुणांनी अपहरण केले, नंतर जंगलात नेत बंदुकीचा धाक दाखवून तिच्यावर सामूहिक अत्याचार करण्यात आला. यानंतर तिच्या कुटुंबीयांच्या तक्रारीच्या आधारे संबंधित दोघांविरुद्ध एफआरआय दाखल करण्यात आला.

12 वर्षांची मुलगी लघुशंकेसाठी उठली

संबंधित गावातील 12 वर्षांची अल्पवयीन मुलगी रविवारी रात्रीच्या सुमारास साडे दहा वाजता लघुशंकेसाठी उठली होती. मिळालेल्या माहितीनुसार, त्याच गावातील तरुण आपल्या मित्रासोबत तिथे आला, त्याने बंदुकीचा धाक दाखवून तिचे अपहरण केले आणि नंतर तिला जंगलात नेले. नंतर त्या दोघांनी तिच्यावर सामूहिक अत्याचार केला.

पीडित मुलीवर सामूहिक अत्याचार

दरम्यान, पीडित मुलीवर सामूहिक अत्याचार केल्यानंतर ती बेशुद्धवस्थेत पडली होती. ते दोघेही बेशुद्ध अवस्थेत सोडून पळून गेले. कशीबशी ती मुलगी घरी पोहोचली आणि तिने आपल्या कुटुंबीयांना घडलेल्या घटनेबाबत सांगितलं. अशातच कुटुंबीयांनी पोलीस ठाणे गाठून आरोपी गोल्डी आणि त्याच्यासह इतर असलेल्या साथीदारांविरुद्ध एफआरआय दाखल केला. महिला, मुलींवर अन्याय अत्याचाराच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. यामुळे महिला आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. अशातच कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होताना दिसतेय.



सुशिक्षित वाटणाऱ्या कुटुंबाचा खरा चेहरा समोर

पीडित महिलेचे वडील, जे 33 वर्षे सैन्यात सेवा बजावून निवृत्त झालेले हवालदार आहेत, त्यांनी 26 मे रोजी आपल्या मुलीची सासरच्या तावडीतून सुटका केली. त्यानंतर त्यांनी सोमवारी (1 जून) संध्याकाळी पोलिसांत रीतसर तक्रार दाखल केली. वडिलांनी दिलेल्या माहितीनुसार, 2024 मध्ये हा विवाह झाला होता. सुरुवातीला सुशिक्षित वाटणा ्या या कुटुंबाचा खरा चेहरा लग्नाच्या काही महिन्यांतच समोर आला. सासूने वेगवेगळ्या कारणांवरून महिलेचा मानसिक आणि शारीरिक छळ करण्यास सुरुवात केली.

विवाहित महिलेला तिच्या सासरच्या मंडळींनी 10 महिने शौचालयात डांबले... भयंकर सत्य समोर

■मुंबई। प्रतिनिधी,

घरगुती हिंसाचाराची एक अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. एका 32 वर्षीय विवाहित महिलेला तिच्या सासरच्या मंडळींनी तब्बल 10 महिने एका शौचालयात कोंडून ठेवल्याचा आणि तिचा छळ केल्याचा आरोप आहे. केंद्रीय विद्यालयात शिक्षक असलेल्या पतीसह सासू-सासऱ्यांनी या महिलेवर काठ्या आणि बाटल्यांनी गंभीर अत्याचार केले. हा अमानुष प्रकार उघडकीस आल्यानंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. उत्तराखंडच्या डेहराडूनमधील ही घटना आहे.

शौचालयात डांबून ठेवले

हा छळ फेब्रुवारी 2025 मध्ये महिलेने जुळ्या मुलांना जन्म दिल्यानंतर पराकोटीला पोहोचला. सासरच्यांनी नवजात बालकांना आईपासून वेगळे केले आणि तिला साधे अंगावरचे दूधही पाजू दिले नाही. त्यानंतर जुलै 2025 पासून मे 2026 पर्यंत म्हणजेच जवळपास 10 महिने तिला खोलीत आणि शौचालयात डांबून ठेवण्यात आले. या काळात तिला जेवणात केवळ भात, कांदा, मिरची आणि मीठ दिले जात होते. तसेच दिल्लीहून घरी येणारा तिचा पती आणि सासू-सासरे तिला पाईप आणि काठ्यांनी बेदम मारहाण करत असत. मारहाणीदरम्यान तिचे केस उपटल्यामुळे तिच्या डोक्याला जखमा झाल्या आहेत, तर सासऱ्याने तिचे आक्षेपार्ह फोटो काढून तिला धमकावल्याचाही आरोप आहे.

नवऱ्यासह सासू-सासऱ्यावर गुन्हा दाखल

या गंभीर प्रकरणाची दखल घेत पोलिसांनी पीडित महिलेच्या पतीसह सासू-सासऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासात महिलेच्या शरीरावर गंभीर जखमांचे व मारहाणीचे व्रण आढळून आले आहेत. सध्या पोलीस महिलेच्या सविस्तर वैद्यकीय अहवालाची वाट पाहत असून, त्यानंतर आरोपींवर पुढील कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

आयसीयूमधील पत्नीला जेवण देताना पोलिसानं हटकलं

संतप्त पतीच्या कृतीमुळे सायन रुग्णालयात तणाव... नेमके घडलं काय?

■मुंबई। प्रतिनिधी,

आत्महत्येच्या प्रयत्नामुळे आयसीयूमध्ये दाखल असलेल्या महिलेच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या एका पोलीस शिपायाला शिवीगाळ करुन मारहाण करण्यात आली. याप्रकरणी सायन पोलिसांनी रुग्णालयात दाखल महिलेच्या पतीविरुद्ध भारतीय न्याय सहिता कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

किताबअली मोहम्मद सत्तार शेख, असे या आरोपीचे नाव असून कारवाईनंतर त्याला नोटीस देऊन सोडून देण्यात आले. किताबअली हा त्याच्या पत्नीसोबत चेंबूर परिसरात राहतो. रविवारी 31 मेला त्यांच्यात कौटुंबिक कारणावरुन वाद झाला होता. या वादानंतर त्याची पत्नी रुक्सारने घरातील बाथरुममध्ये आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्यामुळे तिला सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिची प्रकृती गंभीर असल्याने तिच्यावर रुग्णालयातील



आयसीयूमध्ये उपचार सुरु होते.

यावेळी तिच्या सुरक्षेसाठी पोलीस शिपाई शंकर पुकळे आणि रसिका आंग्रे यांना बंदोबस्तकामी ठेवले होते. बुधवारी 3 जूनला रात्री किबातअली हा त्याच्या पत्नीला बाहेरचे जेवण घेऊन आला होता. यापूवीर्ही त्याने अशाच प्रकारे बाहेरचे जेवण आणले होते, मात्र पोलीस शिपाई शंकर पुकळे यांनी त्याला बाहेरचे जेवण पत्नीला देण्यास नकार दिला होता. बुधवारी त्याला पुन्हा नकार दिल्याने तो संतप्त झाला होता. यावेळी त्याने त्यांच्याशी वाद घालून, शिवीगाळ करुन मारहाण केली.

या मारहाणीत त्यांच्या गळ्याला आणि उजव्या हाताच्या करंगळीला दुखापत झाली होती. त्यानंतर तो त्यांना सतत बघून घेण्याची धमकी देत होता. या प्रकाराने सायन रुग्णालयात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षातून ही माहिती प्राप्त होताच सायबन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. घटनास्थळी गेलेल्या पोलिसांनी किताबअलीला पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले होते.

याप्रकरणी शंकर पुकळे यांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी त्याच्याविरुद्ध कर्तव्य बजाविणाऱ्या पोलीस शिपायाला शिवीगाळ करुन मारहाण करणे, सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्यांत त्याच्यावर अटकेची कारवाई दाखवून त्याला नंतर नोटीस देऊन सोडून देण्यात आले होते.

जनगणनेसाठी गेलेल्या शिक्षिकेला मुख्याध्यापकानंच... नेमकं काय घडलं?

■पुणे। प्रतिनिधी,

एका मुख्याध्यापकाने जनगणना कर्तव्यावर असलेल्या आपल्या शिक्षिका पत्नीची निर्घृण हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. आरोपी पतीने केवळ हत्याच केली नाही, तर गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्यासाठी पत्नीचा मृतदेह पेट्रोल टाकून जाळून टाकला. यानंतर पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी त्याने स्वतःच पत्नी बेपत्ता झाल्याची खोटी तक्रार पोलीस ठाण्यात नोंदवली होती. मात्र, पोलिसांनी सखोल तपास करून या हत्याकांडाचा यशस्वी उलगडा केला. गुजरातच्या अहमदाबादमधील ही घटना आहे.

रस्त्यातच वाद झाला

एका वृत्तानुसार, मृत रीना यांचे पती बलदेव हे एका सरकारी



जनगणनेसाठी बाहेर पडली अन्...

मिळालेल्या माहितीनुसार, अहमदाबाद येथील रहिवासी असलेले हे शिक्षक पती-पत्नी बुधवारी (2 जून) सकाळी एकत्रच जनगणनेच्या कामासाठी घरातून बाहेर पडले होते. मात्र, वाटेतच महिला संशयास्पद परिस्थितीत बेपत्ता झाल्याचे सांगत पतीने पोलिसात तक्रार दिली. त्याच दिवशी एका महिलेचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आणि त्याची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू केले. तपासादरम्यान या मृत महिलेची ओळख प्राथमिक शाळेतील 45 वर्षीय शिक्षिका रीना जाला अशी पटली.

प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. बलदेव आणि रीना बुधवारी जनगणनेसाठी दुचाकीवरुन निघाले होते. वाटेत त्यांच्यात कोणत्या तरी कारणावरून जोरदार वाद झाला. या वादातून संतापलेल्या बलदेवने स्कूटी कालव्याजवळील एका निर्जन रस्त्याकडे वळवली आणि तिथे रीना यांच्या डोक्यात दगडाने प्रहार करून त्यांची हत्या केली. यानंतर मृतदेहाची ओळख पटू नये म्हणून त्याने स्वतःच्या स्कूटीमधून पेट्रोल काढले, ते रीना यांच्या मृतदेहावर शिंपडले आणि मृतदेह पेटवून दिला. हा भयानक गुन्हा केल्यानंतर तो थेट पोलीस ठाण्यात पोहोचला आणि पत्नी बेपत्ता झाल्याचा बनाव रचला.

'या' कारणामुळे केली हत्या

दरम्यान कालव्याच्या कडेला एका महिलेचा अर्धवट जळालेला मृतदेह स्थानिक शेतकऱ्याला दिसला, ज्याने तातडीने पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. पोलिसांनी सांगितले की, तांत्रिक पुरावे गोळा करुन त्यांच्या आधारे बलदेवची कसून चौकशी करण्यात आली. यावेळी त्याने कौटुंबिक वादामुळे आपल्या पत्नीची हत्या केल्याची कबुली दिली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com